रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १२७
www.ramprahar.com

◆ सोमवार, २४ नोव्हेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग

राज्यातील शाळांमध्ये नव्याने पटपडताळणी होणार/२

खारघर येथे बालकर्करोग निवासस्थानाचे उद्घाटन/६

राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी आर्यन कमानेची निवड/८

## सिंध पुन्हा भारताचा भाग होऊ शकतो –राजनाथ सिंह



**नवी दिल्ली :** भारताचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी एका कार्यक्रमात बोलताना मोठे विधान केले आहे. 'सीमा कधी बदलेल हे कोणी सांगू शकत नाही आणि उद्या सिंध भारताला पुन्हा परत मिळू शकतो', असे त्यांनी ज्येष्ठ नेते लालकृष्ण आडवाणी यांच्या एका पुस्तकाचा दाखला देत म्हटले आहे. दिल्लीत रविवारी (दि. २३) सिंधी अधिवेशनाला संबोधित करताना राजनाथ सिंह म्हणाले की, मी आडवाणींचा एक कोट सांगत आहे. आज सिंधची भूमी भारताचा भाग भलेही नसेल, पण सभ्यतेच्या दृष्टीने सिंध नेहमीच भारताचा भाग राहील. आता राहिली गोष्ट जमिनीची, तर सीमा कधी बदलेल हे कोणीही सांगू शकत नाही. उद्या सिंध भारताला पुन्हा परत मिळू शकते. सिंधू नदीला पवित्र मानणारे आपले सिंधचे लोक कुठेही असले तरी नेहमीच आपले असतील.

# भाजपमुळे पनवेल परिसरात वेगाने विकास

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे प्रतिपादन; पुलासह करंजाडेतील रस्ते कामाचे भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाच्या प्रयत्नांमुळेच पनवेल परिसराचा विकास वेगाने होत असून विकासाची गंगा करंजाडे येथे आल्याचे गौरवोद्गार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शनिवारी (दि. २२) काढले.

पनवेल महापालिकेच्या वतीने पनवेल आणि करंजाडेदरम्यान गाढी नदीवर बांधण्यात येणाऱ्या ५० कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी नवीन पुलाचे तसेच सिडकोच्या माध्यमातून १४ कोटी रुपयांच्या निधीतून करंजाडे सेक्टर १ ते ६मधील अंतर्गत रस्त्यांच्या डांबरीकरणाचे भूमिपूजन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. या महत्त्वाच्या कामांच्या शुभारंभामुळे वाहतुकीमध्ये सुलभता येणार असून परिसराचा चेहरामोहरा बदलण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी, पनवेल महापालिकेच्या माध्यमातून करंजाडेच्या विकासाच्या दृष्टीने नवा अध्याय लिहिला जात असल्याचे सांगून करंजाडे आणि उलवे नोड पनवेल महापालिकेत समाविष्ट करण्यासाठी आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या पाठपुराव्याची माहिती दिली. मंत्रालयीन स्तरावर कागदपत्रांची पूर्तता पूर्ण होत आली असून लवकरच करंजाडे नोड पनवेल महापालिकेला जोडला जाईल. सध्या पुलाच्या माध्यमातून जोडणी सुरू होत असून हा महत्त्वाचा पूल लवकर पूर्ण व्हावा यासाठी आपण सर्वजण पाठपुरावा





करू, असेही ते म्हणाले.

आपल्या भाषणात आमदार महेश बालदी यांनी, लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे करंजाडे परिसराला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले असल्याचे नमूद केले. परिसरात अनेक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा सुरू असून हा पूल पुढील १८ महिन्यांमध्ये करंजाडेवासीयांच्या सेवेत दाखल होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त करून जनतेची सेवा करण्यासाठी भाजप तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे, अशी ग्वाही दिली.

या कार्यक्रमास भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी जि.प. सदस्य जीवन म्हात्रे, माजी पं.स. सदस्य निलेश पाटील, जगदीश पवार, करंजाडेचे सरपंच मंगेश शेलार, उपसरपंच सागर आंग्रे, भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, पनवेल दक्षिण मंडळ अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेल पश्चिम मंडळ अध्यक्ष रूपेश धुमाळ, करंजाडे विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, मयुरेश नेतकर, ज्येष्ठ नेते सुभाष म्हात्रे, प्रकाश जितेकर, माजी सरपंच रामेश्वर आंग्रे, शहर अध्यक्ष संदेश पाटील, वडघर जि.प. विभागीय अध्यक्ष गजानन पाटील, पं.स. अध्यक्ष समीर केणी, गुळसुंदे जि.प. विभागीय अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे, कुंडेवहाळ ग्रामपंचायतीचे सरपंच सदाशिव वास्कर, प्रकाश पाटील, मनखुश नाईक, महेंद्र गोजे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा





## शेकाप, 'उबाठा'ला पनवेलमध्ये धक्का!

### माजी जि.प. सदस्य राजू पाटील यांच्यासह सरपंच, उपसरपंच, पदाधिकारी, कार्यकर्ते भाजपत दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला पनवेल तालुक्यात जोरदार धक्का बसला आहे. शेकापचे गुळसुंदे विभाग जिल्हा परिषद सदस्य राजू पाटील, सांगुर्ली ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रविशेठ चोरघे, नांदगाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच दीपक ठोंबरे, शिवसेना 'उबाठा'चे सांगुर्ली शाखाप्रमुख नितेश पारधी आणि युवासेना अधिकारी अनिकेत पाटील आदींनी समर्थकांसह शनिवारी (दि. २२) भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. या सर्व प्रवेशकर्त्यांचे आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी आणि ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे यांनी पक्षात स्वागत केले.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमास महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, जीवन म्हात्रे, माजी पंचायत समिती सदस्य जगदीश पवार, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, पनवेल दक्षिण मंडळ अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पश्चिम मंडळ अध्यक्ष रूपेश धुमाळ, माजी नगरसेवक सुनील बहिरा, गुळसुंदे विभागीय अध्यक्ष अविनाश गाताडे, कृष्णा पारंगे, प्रवीण खंडागळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.





या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

पनवेल मतदारसंघात आमदार प्रशांत ठाकूर आणि उरण मतदारसंघात आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपच्या माध्यमातून होत असलेला विकास तसेच सक्षम कार्यप्रणालीवर आकर्षित होऊन विविध पक्षांचे पदाधिकारी 'कमळ' हाती घेत आहेत. याच अनुषंगाने शेकापचे माजी जि.प. सदस्य राजू पाटील, माजी सरपंच रविशेठ चोरघे, उपसरपंच दीपक ठोंबरे, शाखाप्रमुख नितेश पारधी, युवासेना अधिकारी अनिकेत पाटील, सोमाटणे ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच संजय पाटील, संजय डुके, सदस्य गंगाराम पाटील, नामदेव म्हस्कर, भावेश माळी, माजी सदस्य अशोक पाटील, **(पान २ वर..)**

## निवडक

### लक्ष्य सेनने ऑस्ट्रेलियन ओपन टेनिस स्पर्धा जिंकली



**सिडनी :** भारताचा स्टार बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनने हंगामातील पहिल्या विजेतेपदाला गवसणी घातली आहे. त्याने पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत जपानच्या युशी तनाकाला हरवून ऑस्ट्रेलियन ओपन सुपर ५०० स्पर्धा जिंकली. लक्ष्यने आपला दमदार फॉर्म कायम ठेवत ३८ मिनिटांच्या सामन्यात २६ वर्षीय तनाकाला २१–१५, २१–११ असे हरवले.

### स्मृती मानधनाच्या वडिलांची प्रकृती बिघडली; लग्न स्थगित

**सांगली :** स्मृती मानधना व पलाश मुच्छल यांचा रविवारी (दि. २३) विवाह होणार होता, पण स्मृतीच्या वडिलांची सकाळी अचानक तब्येत बिघडली आणि त्यांना तातडीने रूग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेनंतर स्मृती–पलाशचा लग्नसोहळा स्थगित करण्यात आल्याची माहिती तिच्या कुटुंबियांनी दिली. स्मृतीचे वडील श्रीनिवास मानधना यांच्यावर सर्वहित रुग्णालयात उपचार सुरू असून ते डॉक्टरांच्या निरीक्षणाखाली आहेत.

# विकास हाच आमचा धर्म आणि सर्व समाजांना सोबत घेऊन पुढे जाणार!

## आमदार महेश बालदी यांचा मनसेसह 'मविआ'वर पलटवार

**उरण : बातमीदार**

विकास हाच आमचा धर्म आहे आणि सर्व समाजांना सोबत घेऊन आम्ही पुढे जाणार आहोत. उरणचा विकास अभिप्रेत असलेले सर्व हिंदू–मुस्लिम बांधव आपल्या प्रचारात सहभागी झाले आहेत. त्यामुळे भाजप महायुतीचे नगराध्यक्ष आणि सर्व नगरसेवक मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास असे आमदार बालदी यांनी व्यक्त केला. ते जाहीर सभेत बोलत होते.

उरण नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी भाजप महायुतीने प्रचाराचा नारळ फोडला असून बोरी पाखाडी परिसरात शुक्रवारी पहिली जाहीर सभा आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत झाली. या सभेला नगराध्यक्षपदाच्या उमेदवार





शोभा कोळी–शाह, प्रभाग क्र. २च्या उमेदवार रिबेका मढवी, नंदकुमार लांबे, प्रभाग क्र. ३च्या उमेदवार नम्रता ठाकूर, सुरेश शेलार, प्रभाग क्र. ४चे उमेदवार संदीप पानसरे, रोशनी थळे, भाजप राज्य परिषद सदस्य व उमेदवार रवी भोईर, पनवेलचे माजी नगरसेवक मुकीत काझी, अल्पसंख्याक सेलचे जिल्हाध्यक्ष रेहान तुंगेकर, भाजप शहर अध्यक्ष व माजी नगरसेवक कौशिक शाह, रमझान खान, सलाम खान, वारिस मुल्ला, शाही मोहम्मद खान, बाशिध अली, हैदर मुकरी आदी उपस्थित होते.

दोन दिवसांपूर्वी मुस्लिम मतदारांसाठी भाजपने उर्दू भाषेतील प्रचारपत्रके वाटल्यानंतर मनसे आणि महाविकास आघाडीने टीका केली होती. जाहीर प्रचारसभेत आमदार महेश बालदी यांनी विरोधकांवर जोरदार पलटवार करत त्यांचा खरपूस समाचार घेतला. उर्दू भाषेत प्रचारपत्र छापणे गुन्हा आहे का? ज्या मनसेने महाविकास आघाडीला पाठिंबा दिला, त्यांनी सरळ सांगावे की त्यांना मुस्लिम मते नकोत. तुम्हाला उर्दू शेरोशायरी, उर्दू गझला चालतात, मग उर्दू पत्रकाची अडचण का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. ते पुढे म्हणाले, भाजपला उर्दूची काहीही अॅलर्जी नाही. या देशातील मुस्लिम जो भारत माता की जय म्हणतो आणि देशासोबत उभा राहतो, तो आमचा भाऊ आहे. उरणमध्ये हिंदू–मुस्लिम एकोप्याची परंपरा आहे आणि वेळप्रसंगी सर्वजण खांद्याला खांदा लावून उभे राहतात.

उरणमध्ये गेल्या २० वर्षांपासून मुस्लिम समाज भाजपसोबत असल्याचा दावा करीत आमदार महेश बालदी म्हणाले की, आमचे तीन नगरसेवक मुस्लिम आहेत. विकास हाच आमचा धर्म असून सर्व समाजांना सोबत घेऊन आम्ही पुढे जाणार आहोत. त्यामुळे अशा टीकांना मी घाबरत नाही. या जाहीर सभेला पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अर्णव खैरे मृत्यूप्रकरणी अखेर गुन्हा दाखल

**डोंबिवली : प्रतिनिधी**



लोकल प्रवासात हिंदीत बोलला म्हणून मारहाण झाल्यानंतर अर्णव जितेंद्र खैरे या कल्याणमध्ये राहणाऱ्या तरुणाने केलेल्या आत्महत्येची दखल पोलिसांनी अखेर घेतली आणि अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

कल्याण ते ठाणे रेल्वेमार्गावर धावणाऱ्या लोकलमध्ये १८ नोव्हेंबर रोजी सकाळच्या सुमारास चार–पाच जणांच्या टोळक्याने मिळून केलेल्या मारहाणीनंतर अर्णव खैरे या १९ वर्षीय महाविद्यालयीन विद्यार्थ्याने घरी येऊन जीवन संपविले होते. अर्णवचे वडील जितेंद्र खैरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून घटनेच्या पाच दिवसांनंतर कल्याणच्या कोळसेवाडी पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## पुण्याच्या औंधमध्ये बिबट्याची एन्ट्री

**पुणे :** येथील औंध भागात बिबट्याची एन्ट्री झाली आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात स्थानिकांना बिबट्या आढळून आल्याने पुणेकरांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. औंध भागातील एका सोसायटीच्या आसपास रविवारी (दि. २३) पहाटे बिबट्याचा संचार सुरू होता. काही वेळ घालवल्यानंतर पहाटे ४नंतर हा बिबट्या दिसेनासा झाला. वन विभागाकडून त्याचा शोध सुरू आहे.

# भारताच्या लेकी बनल्या वर्ल्ड चॅम्पियन!

## पहिलाच टी–२० ब्लाइंड वूमन्स वर्ल्डकप जिंकला

**कोलंबो : वृत्तसंस्था**

भारतीय महिला अंध (ब्लाइंड) क्रिकेट संघाने इतिहास रचला आहे. श्रीलंकेत खेळला गेलेला पहिल्यावहिला महिला ब्लाइंड टी–२० विश्वचषक भारतीय संघाने जिंकला. संपूर्ण स्पर्धेत भारत अपराजित राहिला आणि अंतिम सामन्यातही त्यांचे वर्चस्व कायम राहिले. अंतिम सामन्यात भारतीय संघाने नेपाळला सात विकेट्सने पराभूत केले.

फायनलमध्ये नाणेफेक जिंकल्यानंतर भारताने नेपाळला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. नेपाळच्या संघाला २० षटकांत पाच विकेट्स गमावून ११४ धावा करता आल्या. सरिता घिमिरेने सर्वाधिक ३५ धावा, तर बिमला रायने २६ धावा केल्या. इतर कोणत्याही फलंदाजाने दुहेरी आकडा गाठला नाही. भारताकडून जमुना राणी टुडू आणि अनु कुमारी यांनी प्रत्येकी एक बळी टिपला.



प्रत्युत्तरात भारतीय संघाने केवळ १२.१ षटकांत तीन विकेट्स गमावून लक्ष्य गाठले आणि ४७ चेंडू शिल्लक असताना विजय मिळवला. फुला सरेन हिने २७ चेंडूत नाबाद ४४ धावा केल्या, ज्यामध्ये चार चौकारांचा समावेश होता. करुणा के.ने २७ चेंडूत ४२ धावांची स्फोटक खेळी केली. बसंती हंसदा १३ धावांवर नाबाद राहिली. यासह संघाने वर्ल्डकपवर आपले नाव कोरले.

# मुरूडमध्ये भाजप उमेदवारांचा घरोघरी प्रचार

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाचे जनार्दन सदाशिव कंधारे, सुधीर भिकू पाटील, उमेश रामचंद्र माळी, भाविका परेश किल्लेकर व सीमा जनार्दन कंधारे मैदानात आहेत. त्यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह ग्रामदैवत कोटेश्वरी मातेचे आशीर्वाद घेऊन प्रचाराचा शुभारंभ केला.

मुरूड नगरपालिका निवडणुकीत भाजप स्वतंत्रपणे लढत आहे. याबाबत माहिती देताना जिल्हा कार्यकारिणी सदस्य व उमेदवार जनार्दन कंधारे यांनी सांगितले की, राज्यात भाजप व सहकारी



पक्षांचे सरकार असून मुरूड शहराचा जो विकास झाला, त्याचे श्रेय भाजपचेसुद्धा आहे. लोकांनी विकासकामे पाहून मतदान करावे.

केंद्रात व राज्यात भाजपच्या नेतृत्वाखाली सत्ता असून आमच्या शिलेदारांना निवडून दिल्यास मुरूड शहराच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी आणता येईल. ज्यांना मुरूडचा सर्वांगीण विकास पहायचा आहे त्यांनी भाजपच्या उमेदवारांना मतदान करून विजयी करावे, असे आवाहनही कंधारे यांनी केले.

दरम्यान, जागा कमी लढवत असतानासुद्धा भाजपचे कार्यकर्ते मोठ्या उत्साहाने घराघरात जाऊन नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन करीत आहेत. या प्रचाराला मतदारांचा प्रतिसाद मिळत आहे.

# राज्यातील शाळांमध्ये नव्याने पटपडताळणी होणार

**मालेगाव : प्रतिनिधी**

राज्यातील काही शाळांमध्ये बोगस विद्यार्थी दाखवून पटसंख्या फुगविण्यात येत असल्याच्या तक्रारी होत आहेत. या पार्श्वभूमीवर शिक्षण संचालनालयातर्फे मोठा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थी संख्येची काटेकोर पडताळणी केली जाणार आहे. यामुळे बोगस विद्यार्थी संख्या दाखविणाऱ्या शाळा व संबंधित संस्थांना चाप बसणार आहे.

प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थी उपस्थितीची माहिती यू-डायस प्लस या पोर्टलवर संबंधित मुख्याध्यापकाद्वारे नोंदविण्यात येते. या पोर्टलवर नमूद



असलेल्या विद्यार्थी संख्येनुसार दरवर्षी संच मान्यता अंतिम केली जाते. त्या आधारावर त्या-त्या शाळांमधील शिक्षक पदांची संख्या निश्चित केली जात असते, परंतु काही शाळांमध्ये ही पटसंख्या वाढवून दाखवली जात असल्याने शिक्षकांची अनावश्यक पदे देखील निर्माण होतात. परिणामी शासनाला आर्थिक फटका सहन करावा लागतो, अशा तक्रारी होत आहेत.

त्यामुळे पोर्टलवर दाखवलेली विद्यार्थी संख्या आणि प्रत्यक्ष वर्गात उपस्थित विद्यार्थी याची खातरजमा करण्याचा प्रयत्न शिक्षण खात्याचा या निमित्ताने आहे. या माहितीचे प्रमाणिकरण व सत्यता पडताळणीची जबाबदारी कार्यक्षेत्रातील केंद्रप्रमुख व गट शिक्षणाधिकाऱ्यांवर टाकण्यात आली आहे. त्यामध्ये अनियमितता झाल्यास केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी व मुख्याध्यापकांना जबाबदार धरण्यात येईल, असा इशारा शिक्षण खात्यातर्फे देण्यात आला आहे.

मुख्याध्यापकांनी नोंदवलेली यू-डायस प्लस पोर्टलवरील विद्यार्थी संख्येची माहिती केंद्रप्रमुखांकडे वर्ग केली जाते. पोर्टलवर प्राप्त असलेल्या माहितीची केंद्रप्रमुखांनी प्रत्यक्ष शाळेला भेट देऊन खात्री करावयाची आहे. विद्यार्थ्यांची दैनिक उपस्थिती, भेटीच्या दिवशी हजर असलेले विद्यार्थी, परीक्षा दिनांकाच्या दिवशी उपस्थित विद्यार्थी तसेच यापूर्वी शाळा भेट झाल्याच्या प्रसंगी असलेली दैनिक उपस्थिती या सर्व बाबी तपासून ही माहिती केंद्रप्रमुखांनी फेरपडताळणीसाठी गटशिक्षणाधिकारी लॉगिनला वर्ग करावयाची आहे.

वर्ग झालेल्या विद्यार्थ्यांच्या या माहितीची गटशिक्षणाधिकाऱ्यांनी पुनश्च पडताळणी करावी आणि योग्य असल्याची खात्री झाल्यावर १५ डिसेंबरपर्यंत ती अंतिम करावी, असेही शिक्षण संचालनालयाकडून बजावण्यात आले आहे.

या पडताळणीसाठी राज्यस्तरावरदेखील विशेष पथकांची निर्मिती केली जाणार आहे. या पथकांच्या माध्यमातून एकाचवेळी सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांची उपस्थिती पोर्टलवरील नोंदीप्रमाणे आहे की नाही, हे तपासण्यात येणार आहे. सदर पडताळणीत अनियमितता किंवा चुकीच्या पद्धतीने विद्यार्थी प्रविष्ट झाल्याचे निदर्शनास आल्यास ज्या पातळीवर ही अनियमितता आढळून येईल, त्या संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

## महाडमध्ये दुकानाला आग; लाखोंचे नुकसान

**महाड : प्रतिनिधी**

महाडमधील महालक्ष्मी बेकरी दुकानाला आज मध्यरात्री भीषण आग लागली या आगीत दुकानातील सर्व साहित्य जळून खाक झाले. काही वेळातच आग विझवण्यात आली असली तरी या वेळी लाखोंचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

महाड शहरातील चवदार तळे परिसरात मध्यरात्रीच्या सुमारास महालक्ष्मी बेकरी तसेच दुग्धजन्य वस्तू विक्री करणाऱ्या एका दुकानाला आग लागण्याची घटना घडली. अचानक भडकल्यानं दुकानातील सर्व साहित्य जळून नुकसान झाले.




महाड नगरपालिकेच्या अग्निशमन दलाने तात्काळ धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले. ही आग शॉर्ट सर्किटमुळे लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला असून पुढील तपास महाड शहर पोलीस करीत आहेत.

## महाड नगर परिषद निवडणुकीसाठी राष्ट्रवादी-भाजप युतीचा जाहीरनामा प्रसिद्ध

**महाड : प्रतिनिधी**

महाड येथे आगामी महाड नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी-भाजप युतीचा जाहीरनामा खासदार सुनिल तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रसिद्ध करण्यात आला. या जाहीरनाम्यात महाड शहराच्या सांस्कृतिक, शैक्षणिक, औद्योगिक, पर्यटन आणि पायाभूत सुविधा विकासाला केंद्रस्थानी ठेवून आगामी काळातील सर्वांगीण प्रगतीचा स्पष्ट आराखडा मांडण्यात आला आहे.



महाड नगरपालिका प्रचार आता शिगेला पोहचला असून उमेदवारांच्या प्रचार फेऱ्या वाढल्या आहेत. मतदारांसमोर जाताना उमेदवारांना महाड शहराचा विकासाचा दृष्टिकोन ठेऊनच जावे लागत आहे. विरोधकांकडून आश्वासनाचा पाऊस होत असताना भाजपा राष्ट्रवादी युती ने देखील आपला विकासाचा जाहीरनामा जनतेसमोर आणला आहे. आज राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष व खासदार सुनिल तटकरे यांच्या प्रमुख उपस्थिती महाड नगरपालिका निवडणूकीचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला या प्रसंगी माजी नगराध्यक्ष स्नेहल जगताप, भाजपाचे बिपीन महामुणकर यांच्यासह पदाधिकारी व उमेदवार उपस्थित होते. या निमित्ताने उपस्थितांना संबोधित करताना तटकरे म्हणाले की, आगामी काळातही महाड शहर आणि तालुक्याचा शाश्वत, सर्वांगीण व सर्वसमावेशक विकास साध्य करण्यासाठी राष्ट्रवादी-महायुती सरकार कटिबद्ध राहील. शहराच्या ऐतिहासिक वारशाचा अभिमान असलेल्या 'चवदार तळ्या'चा जागतिक पातळीवर लौकिक वाढवण्यास प्राधान्य देण्यात येईल, असा विश्वास व्यक्त त्यांनी व्यक्त केला.

आगामी नगरपरिषद निवडणुकीत विकासाला केंद्रस्थानी ठेवून राष्ट्रवादी-भाजप युतीच्या सर्व अधिकृत उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करावे, असे उपस्थित सर्व महाडच्या नागरिकांना आवाहन केले. या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ नेते, पदाधिकारी, शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खोपोलीत मंत्री उदय सामंत यांची सभा

### पदाधिकारी, कार्यकर्त्यांमध्ये उत्साह

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपरिषद निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर २२ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री आणि शिवसेना उपनेते उदय सामंत यांची लायन्स क्लब येथे जाहीर सभा झाली. या सभेला मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे, कर्जत-खोपोलीचे आमदार महेंद्र थोरवे उपस्थित होते. यासभेत आगामी निवडणुकीत नगराध्यक्ष म्हणून कुलदीपक शेंडे मोठ्या मताधिक्याने व महायुतीचे उमेदवार मोठ्या संख्येने नगरसेवक म्हणून निवडून येतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

या वेळी शिवसेना मुख्य नेते व लाडके उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदेसाहेब यांच्या



नेतृत्वाने प्रभावित होऊन आमदार महेंद्र थोरवे साहेबांच्या विकासकामाने, शिवसेनेच्या जनहिताच्या धोरणाला महत्त्व देऊन विविध पक्षातील कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. मंत्री महोदय उदय सामंत त्यांच्या अनोख्या शैलीत सभागृहाला संबोधले. महायुतीच्या माध्यमातून राज्यात होणाऱ्या विकासकाम, पायाभूत सुविधा, महिला सक्षमीकरण, रोजगार मिळावा यासाठी राबवलेल्या कामांची माहिती दिली. तसेच खोपोलीच्या पाठीशी आपलं सरकार भक्कमपणे उभं आहे, असा मजबूत विश्वास देऊन त्यांनी तमाम खोपोलीकरांना आश्वस्त केले.



राज्यात महायुतीच्या सरकारने जनहिताची कित्येक काम केली, याचा साक्षीदार संपूर्ण महाराष्ट्र आहे. शिवसेना मुख्य नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांच्या नेतृत्वाखाली अधिक लोकांपर्यंत शिवसेना पोहचली. रायगड जिल्ह्यावर आणि खोपोली शहरासाठी भरघोस विकासनिधी देण्यात आलेला आहे.त्यातून विकासगंगा वाहताना दिसतेय. त्यामुळे खोपोलीची जनता प्रगतीला साथ देत, या निर्धाराने लढाई लढली जाईल. तसेच खोपोलीच्या जनतेचा विश्वास आम्ही नेहमी जपू. तुमच्यासोबत, तुमच्या सेवेसाठी शिवसेना सदैव तयार आहे, अशी खात्री खोपोलीकरांना दिली.

या सभेला खोपोलीच्या जनतेचा, कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांचा लाभलेला प्रतिसाद नवचैतन्य निर्माण करणारा होता. शिवसेनेच्या जयघोषाने अख्खं सभागृह दणाणून गेलेलं. येणाऱ्या निवडणुकीत शिवसेना-भाजपा-आर. पी. आय. महायुतीच्या विजयाबद्दलचा आत्मविश्वास कार्यकर्त्यांच्या चेहऱ्यावर झळकत होता.

## पीएएसच्या प्राथमिक शाळेत नव्या जगाचे पालकत्व कार्यशाळा

**पेण : प्रतिनिधी**

पेण एज्युकेशन सोसायटीच्या (पीएएस) प्राथमिक शाळेत सोबती ट्रस्टने आयोजित केलेल्या नव्या जगाचे पालकत्व ही कार्यशाळा पालकांसाठी आपल्या सगळ्यांसाठी मनाला भिडणारा आणि विचारांना नवी दिशा देणारी होती, असे मत पालकांनी व्यक्त केले.



मानसोपचार तज्ञ डॉ.तुषार पाटील आणि मानसोपचारतज्ञ डॉ नरेश पवार यांनी कृती, नाट्य आणि मनमोकळ्या संवादातून पालक आणि मुलांच्या भावना अगदी हळुवारपणे उलगडून दाखवल्या. या कार्यक्रमासाठी पेण एज्युकेशन सोसायटी संस्थेचे अध्यक्ष ॲड.मंगेश नेने, उपकार्याध्यक्ष संजय कडू, सदस्या डॉ. नीता कदम, मुख्याध्यापिका लेखा ठाकूर तसेच पालक सदस्य व पालक उपस्थित होते.

आपण सगळेजण मिळून मुलांसाठी सुरक्षित, प्रेमळ आणि समजून घेणारे जग घडवू या अशी भावना निर्माण करून पालकांना मुलांच्या समस्या व त्या समस्या सोडविण्यासाठी आपण आई वडील म्हणून काय केले पाहिजे यासाठी पालकांना बोलते करून त्यांच्या मनातील प्रश्नांना वाचा फोडून अनेक उदाहरणे देऊन शंकांचे निरसन केले.

मुलांमध्ये संवाद घडवून आणणे, मोबाईलपासून मुलांना दूर ठेवणे, खेळण्यासाठी प्रोत्साहित करणे, मनावरचा दडपण कमी करण्यासाठी आई बाबांनी मुलांना आपलेसे करणे व प्रेमाचे संभाषण करून त्यांच्या आवडी निवडी लक्षात घेऊन सकारात्मक विचार तयार करून आपला पाल्य यशस्वी होण्यासाठी स्वतःमध्ये बदल करणे काळाची गरज ओळखून पालकांनी मुलांना अभ्यासाची गोडी वाढवावी, असे डॉ.तुषार पाटील यांनी पालकांना मार्गदर्शन करताना केले. तर डॉ.नरेश पवार यांनी मन शांत ठेवण्यासाठी करावयाची प्रात्यक्षिके सादर करुन पालकांच्या मनात सकारात्मक उर्जा निर्माण करून माहिती दिली.

सोबती ट्रस्ट सर्व मान्यवर, पालकवर्ग, शिक्षकवर्ग आणि पेण एज्युकेशन सोसायटीच्या प्राथमिक शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली. सहशिक्षिका गीता म्हात्रे यांनी आभार व्यक्त केले.

## कृषी स्वावलंबन व कृषी क्रांती योजनेच्या लाभासाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हयातील ग्रामीण भागातील अनुसूचित जाती, जमातीच्या शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून जीवनमान उंचावणे हा उद्देश समोर ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना सुरू करण्यात आली आहे.

जिल्हा परिषद, रायगड मार्फत या योजनांची अंमलबजावणी करण्यात येणार असून पात्र शेतकऱ्यांना ऑनलाईन अर्ज करावयाचे आहेत. या योजनेंतर्गत नवीन विहीरीचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांना चार लाख, जुनी विहीर दुरूस्ती एक लाख, शेततळे प्लास्टीक अस्तरीकरण दोन लाख, वीज जोडणी आकार २० हजार, पंपसंच ४० हजार, तुषार सिंचन ४७ हजार, ठिबक सिंचन ९७ हजार, यंत्रसामुग्री ५० हजार, पीव्हीसी/एचडीपीई पाईप ५० हजार, परसबागेसाठी पाच हजार, विंधन विहीरीसाठी ५० हजार पर्यंतचे थेट अनुदान मिळणार आहे.

योजनेचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांचे पात्रता निकष जारी करण्यात आले आहेत जसे की अर्जदार अनुसूचित जाती/नवबौध्द/अनुसूचित जमाती प्रवर्गातील असावा त्यासाठी जातीचे प्रमाणपत्र आवश्यक, जमीनधारणेचा ७/१२ दाखला व ८ अ उतारा असणे आवश्यक आहे. जमीनधारणा ०.४० हे ते ६.०० हे पर्यंत मर्यादित असावी.

शेतक-यांनी योजनांचा लाभ घेण्यासाठी महा-डीबीटी पोर्टलचे http://mahadbt.maharashtra.gov.in/farmer/Login, या संकेतस्थळावर अर्ज दाखल करावा. या योजनेंतर्गत ऑनलाईन अर्ज स्वीकृतीपासून लाभार्थ्यांना अनुदान अदा करण्याची सुविधा पोर्टलद्वारे उपलब्ध करून देण्यात आली आहे. एकत्रित संगणकीय सोडत पध्दतीने लाभार्थी निवडण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ मोठ्या प्रमाणात घ्यावा व अधिक माहितीसाठी तालुकास्तरावरील पंचायत समितीच्या कृषि अधिकाऱ्यांशी संपर्क करावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजीत बडे, कृषी विकास अधिकारी पवनकुमार नजन व जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) निकिता सुर्यवंशी यांनी केले आहे.

## भाजपतर्फे खालापूरच्या नवघरमध्ये आरोग्य शिबिर




**चौक :** भाजप तालुका खालापूर, लायन्स क्लब खालापूर यांनी मेडिकव्हर हॉस्पिटल खारघर यांच्या संयुक्त माध्यमातून नवघर येथे महाआरोग्य शिबिर आयोजित केले होते.

या शिबिराचा तीनशे पेक्षा जास्त लोकांनी आपला ब्लड प्रेशर, मधुमेह व डोळे तपासून घेतले. दमा लागणे, थकवा जाणवत असणे अशा लोकांचा ECG करण्यात आला. ज्या रुग्णांना चष्मा लागला त्यांना मोफत चष्मा व ड्रॉप वाटप करण्यात आले.

भाजप नवघर प्रमुख ओमकार देशमुख, वैभव देशमुख ज्येष्ठ नागरिक, भाजपचे कार्यकर्ते व नवघर ग्रामस्थ यांनी आपला सहभाग नोंदवला.

प्रोजेक्ट हेड अध्यक्ष किशोर पाटील, लहू भोईर, लायन हरिभाऊ जाधव, भरत पाटील हे उपस्थित राहून आपले योगदान दिले. या वेळी परिसरातील नागरिक यांनी शिबिर आयोजित केल्याबद्दल भाजपचे व लायन क्लब यांचे आभार मानले.

पान १ वरुन

## शेकाप, 'उबाठा'ला पनवेलमध्ये धक्का!

कसळखंड ग्रामपंचायतीचे माजी प्रभारी सरपंच अजित पाटील, वावेघर ग्रामपंचायतीचे सदस्य रमेश चव्हाण, माजी सरपंच विनायक राठोड, माजी उपसरपंच नरेश भोईर, संतोष भोईर, माजी सदस्य अर्जुन कातकरी, चांभार्ली ग्रुप ग्रामपंचायतीच्या सदस्य बेबी म्हात्रे, वावेघर ग्रामपंचायतीचे सदस्य भावेश माळी, शारुबाई चव्हाण, अध्यक्ष प्रेम चव्हाण, उपाध्यक्ष मोतिलाल पवार, खजिनदार रमेश चव्हाण, सुरेश पवार यांच्यासह तुरमाळे, सांगुर्ली, वावेघर, चांभार्ली येथील शेकाप आणि 'उबाठा'च्या कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. या सर्वांचे स्वागत करण्यात आले.

## जन आरोग्य योजना सर्वांसाठीच ठरणार जीवनदायी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

राज्यातील सर्व शासकीय निमशासकीय अधिकारी कर्मचारी तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांना एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा फुले जन आरोग्य योजना या दोन्ही योजनांच्या माध्यमातून दरवर्षी पाच लाख रुपयेपर्यंतचा मोफत उपचाराचा लाभ मिळणार आहे.

जिल्हा परिषद पंचायत समिती महसूल आणि नगरपरिषदासह सर्वत्र सर्वच यंत्रणांनी आयुष्मान कार्ड काढण्याच्या सूचना दिल्या आहेत. राज्यभरातील शासकीय, निमशासकीय कर्मचाऱ्यांना, अधिकाऱ्यांना यादीत समाविष्ट करण्याच्या सूचना आहे. त्यानुसार तातडीने कर्मचाऱ्यांच्या याद्या तयार करणे बाबत आरोग्य विभागाला निर्देश मिळाले आहेत. त्यासाठी ऑनलाईन अथवा कैम्प लावून प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना आहेत. योजनांमध्ये या आजारावर होणार मोफत उपचार या आरोग्य योजनेअंतर्गत गंभीर ते सामान्य अशा एक हजार ३००हून अधिक प्रकारच्या आजारावर आणि शस्त्रक्रियांचा उपचाराचा समावेश आहे.

राज्यातील महसूल, नगरपरिषद, जिल्हा परिषद, ग्रामपंचायत या ठिकाणच्या कर्मचाऱ्यांना उपचारासाठीचा मोठा खर्च टाळता येणार आहे. एकत्रित योजनेमुळे या कर्मचाऱ्यांना ५ लाख रुपयांच्या आरोग्य खर्चाची चिंता मिटणार आहे. यासाठी कर्मचारी राज्यातील रहिवासी असावा लागणार आहे यासोबतच त्यांच्याकडे रेशनकार्ड असणे आवश्यक आहे.


कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या मोठ्या आणि गंभीर आजारावर उपचार करताना येणाऱ्या हॉस्पिटल बिलाची चिंता मिटणार आहे. ५ लाखापर्यंतचा उपचार खर्च पूर्णपणे सरकार उचलणार आहे.

या योजनेत कंत्राटी कर्मचाऱ्यांचा आणि त्यांच्या कुटुंबीयांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांच्या आरोग्याच्या गरजेच्या वेळी मोठ्या रुग्णालयामध्ये मोफत उपचार घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यातून त्यांना आर्थिक आणि मानसिक आधार मिळणार आहे. हे योजना कर्मचाऱ्यांसाठी दिलासा देणारी आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रत्येक कर्मचारी व त्याच्या कुटुंबातील सदस्यांचे आयुष्मान कार्ड अनिवार्य आहे. त्यामुळे या सरकारी यंत्रणाना शिबिर घेऊन किंवा ऑनलाईन पद्धतीने लवकरात लवकर आपली कार्ड तयार करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.निशिकांत पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी दिल्या आहेत.

## माजी सभापती देवकीबाई कातकरी यांचे निधन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल पंचायत समितीच्या माजी सभापती तथा ज्येष्ठ समाजसेविका देवकीबाई लक्ष्मण कातकरी (वय ७४) यांचे शनिवारी (दि.२२) अल्पशा आजाराने निधन झाले. उलवे नोड सेक्टर २५ येथील निवासस्थानाहून देवकीबाई यांच्या अंत्ययात्रेला सुरुवात झाली. साईनगर स्मशानभूमी, वहाळ येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

देवकीबाई कातकरी यांनी पनवेल पंचायत समितीच्या सभापती पदावर कार्यरत राहून ग्रामीण भागातील महिला व वंचित घटकांसाठी अनेक उपक्रम राबवले होते. त्या ग्रामपंचायतीच्या दोन वेळा सदस्य म्हणूनही निवडून आल्या होत्या. त्यांच्या निधनाबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते जे.एम म्हात्रे, अरुणशेठ भगत, पंचायत समितीच्या माजी सदस्य रत्नप्रभा घरत आदी मान्यवरांनी शोक व्यक्त केला आहे.

### दुखवटा

## बदामीबाई ओसवाल



**चौक :** येथील सामाजिक कार्यकर्त्या बदामीबाई पुनमचंदजी ओसवाल (वय ८३) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. चौक येथील सामाजिक कार्यकर्ते छगन ओसवाल यांच्या मातोश्री बदामीबाई ओसवाल ह्या परिसरातील सामाजिक कार्यकर्त्या होत्या, अनेक गरजू लोकांना त्यांनी आर्थिक मदत केली आहे. त्यांच्या अंत्यविधीस सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कै. बदामीबाई यांना श्रद्धांजी अपर्ण करण्यासाठी चौक येथे प्रार्थना सभा घेण्यात आली होती, त्यावेळी अनेक मान्यवरांनी त्यांच्या आठवणी आणि सामाजिक कामाची माहिती दिली.

# खारघर रेल्वेस्थानकाजवळ फेरीवाले वाढले

**पनवेल : वार्ताहर**

खारघर खारघर रेल्वेस्थानकात बेकायदा फेरीवाल्याचा सुळसुळाट झाला असून, खारघर रेल्वे स्थानकाच्या प्रवेशद्वार असलेल्या मोकळ्या जागेत रेडिमेड कपडे, खेळणी, मोबाईल कव्हर, भेळ आणि फळ विक्रेत्यांनी अनधिकृतपणे व्यवसाय थाटला आहे.




खारघर रेल्वेस्थानकाच्या प्रवेशद्वार अनधिकृत फेरीवाल्यांनी बस्तान मांडलेले असतानाही रेल्वे स्थानकांवर कार्यरत असलेले रेल्वे पोलीस, लोहमार्ग पोलीस, महाराष्ट्र सुरक्षा रक्षक आणि सिडको सुरक्षा रक्षक केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याने प्रवासीवर्गातून नाराजी व्यक्त केली जात आहे.

खारघर रेल्वेस्थानकातून दररोज जवळपास सव्वा लाख प्रवाशी प्रवास करतात. त्यामुळे खारघर रेल्वेस्थानकाच्या मुख्य प्रवेशद्वारावर प्रवाशांची मोठी गर्दी असते. रेल्वेस्थानकाच्या प्रवेशद्वारावर रेडिमेड कपडे, खेळणी, मोबाईल कव्हर, भेळ आणि फळ विक्रेत्यांनी कब्जा केल्यामुळे रेल्वे प्रवाशांना गर्दीतून वाट काढत खारघर रेल्वे स्थानकात जाताना परतताना मार्ग काढावा लागत आहे. एवढेच नव्हे तर दिव्यांग व्यक्तीला खारघर रेल्वे स्थानकात प्रवेश करता येण्यासाठी तयार करण्यात आलेल्या मार्गावर फेरीवाल्यानी कब्जा केल्याचे चित्र दिसत आहे.

> **खारघर रेल्वे स्थानकात पोलीस पथक पाठवून खारघर रेल्वे स्थानक आणि प्रवेशद्वारावरील बेकायदा फेरीवाल्यांना हटविले जाईल.**
>
> **-विजय तायडे,**
> **वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
> **रेल्वे पोलीस ठाणे, पनवेल.**

आठ वर्षांपूर्वी मुंबईतील एल्फिस्टन आणि परेल रेल्वे स्थानक यांना जोडणाऱ्या पुलावर झालेल्या चेंगराचेंगरीत काही प्रवाशांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर रेल्वे स्थानक परिसरात दीडशे मीटर परिक्षेत्रात फेरीवाल्यांना मुंबई उच्च न्यायालयाने मज्जाव केला होता. अलिकडेच दिल्ली मेट्रो स्थानकालगत कार स्फोट झाल्यामुळे पोलीस यंत्रणा जागृत झाली आहे. खारघर रेल्वेस्थानकात अनधिकृत फेरीवाल्यांनी कब्जा केला आहे. सायंकाळी ५नंतर खारघर रेल्वेस्थानकातून बाहेर पडताना प्रवाशांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

# आसूडगावमध्ये क्षुल्लक वादातून मुलीची आत्महत्या

**पनवेल : वार्ताहर**

शाळेतील गॅदरिंगचा कार्यक्रम पाहण्यासाठी लहान भावाने टीव्हीचा रिमोट न दिल्यामुळे झालेल्या वादातून १२ वर्षीय मुलीने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची मन हेलावणारी घटना पनवेल येथील आसुडगाव परिसरात घडली आहे. माही उर्फ अंजली ओमप्रकाश गुप्ता (वय १२) असे या मृत मुलीचे नाव आहे.

आसुडगांव, सेक्टर-५ मध्ये राहणारी माही गुप्ता तिच्या आई-वडील आणि लहान भावासह राहत होती. माही हिला टीव्हीवर तिच्या शाळेचा मुलीची आत्महत्या गँदरिंगचा कार्यक्रम पाहायचा होता. त्यासाठी तिने लहान भावाकडे टीव्हीचा रिमोट मागितला, मात्र लहान भावाला दुसरा कार्यक्रम पाहायचा असल्याने त्याने तिला रिमोट देण्यास स्पष्ट नकार दिला. या क्षुल्लक कारणावरून बहिण-भावांमध्ये जोरदार वाद झाला.

या प्रकारामुळे संतप्त झालेल्या माहीने रागाच्या भरात टोकाचे पाऊल उचलण्याचा निर्णय घेतला. ती तत्काळ घरातील दुसऱ्या मजल्यावर गेली आणि तेथील छताच्या पाईपला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. काही वेळानंतर माहीची आई तिला पाहण्यासाठी वरच्या मजल्यावर गेली असता, तिला माही गळफास घेतलेल्या स्थितीत आढळली.

या हृदयद्रावक प्रकारानंतर माहीच्या आईने शेजाऱ्यांच्या मदतीने तिला तत्काळ पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले, मात्र तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी माहीला दाखलपूर्व मृत घोषित केले. खांदेश्वर पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद अकस्मात मृत्यू म्हणून करण्यात आली असून, पोलीस पुढील तपास करीत आहेत. दरम्यान, अवघ्या १२ वर्षांच्या मुलीने रागाच्या भरात इतके मोठे पाऊल उचलल्याने आसुडगांव परिसरात तीव्र हळहळ व्यक्त होत आहे.

# भाजपतर्फे रक्तदान आणि आरोग्य शिबिर उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष पनवेल तालुका उत्तर मंडळ आणि दिनेशदादा खानावकर युवा मंच नावडे यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिर आणि मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन रविवारी करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी त्यांनी रक्तदात्यांचे कौतुक करून कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे आभार मानले.





माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमीत्त अनेक सामाजिक उपक्रम राबवण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी भाजपच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार नावडे येथे भव्य रक्तदान शिबिर तसेच भारतीय जनता पक्षाचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत वैद्यकीय अरोग्य शिबिर आयोजीत करण्यात आले होते. या शिबिरांना नागरिकांचा चांगला प्रतिसाद लाभला असून अनेक नागरीकांनी आरोग्य तपासणी आणि रक्तदान केले. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचा सत्कार केला.

या शिबिरावेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील, उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, महेश पाटील, प्रकाश खैरे, अंकुश पाटील, राजेश पाटील, आनंद सोनवणे, मिलिंद झुरे, अविनाश सिंग, राजेंद्र गोंधळी, युवामोर्चा जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, या वेळी पनवेल तालुका उत्तर मंडळ युवा मोर्चा उपाध्यक्षपदी प्रल्हाद गायकर, सरचिटणीसपदी विशाल घरत, आणि तळोजा ओवे शहर अध्यक्षपदी रोहित तांबडे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी नियुक्तीपत्र प्रदान करून अभिनंदन केले.

# पैशांसाठी जावयानेच केला सासूचा खून

## मोठे भोम येथील हत्येचा उलगडा

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील मोठेभोम येथील हिराबाई जनार्दन जोशी या ९० वर्षीय वयोवृद्ध महिलेचा संशयस्पद खून झाल्याची घटना ९ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारच्या सुमारास घडली होती.

नातेवाईकांनी पडून मृत्यू झाल्याची तक्रार उरण पोलीस ठाण्यात केली होती, मात्र महिलेच्या डोक्याला गंभीर दुखापत आढळल्याने सुरुवातीपासूनच पोलिसांचा संशय अधिक बळावला होता. या महिलेच्या मृतदेहच्या शवविच्छेदनानंतर टणक वस्तूने जबर मारहाण करून हा खून केल्याचा संशय अधिक वाढला होता. त्यामुळे उरण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनील जोशी यांच्यासह, स.पो.नि.सुनिल केदार, पोलीस उपनिरीक्षक संजय राठोड, हवालदार मच्छिंद्र कोळी यांच्या पोलीस पथकांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवून महत्त्वाचे धागे, दोरे शोधून काढीत या गुन्ह्यातील महत्त्वाचे पुरावे मिळाल्याने या महिलेचा जावई आरोपी सुरेश सावळाराम पाटील (वय ४७, रा. धाकटे भोम) याला ताब्यात घेऊन पोलिसी खाक्या दाखवताच आरोपीने या महिलेचा खून केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. आरोपीला तात्काळ अटक करून उरणच्या कनिष्ठ न्यायालया समोर हजार केले असता, पुढील तपासकामी आरोपीला २७ नोव्हेंबरपर्यंत पाच दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

काही दिवसांपूर्वी हिराबाई जोशी यांनी त्यांच्या जमिन विक्रीचा व्यवहार केला होता. त्यातील १५ लाख रुपये त्यांच्या बँक खात्यात जमा झाले होते. त्यातील सहा लाख रुपये त्यांनी त्यांच्या मुली व नातेवाईकांना दिले होते. तर या महिलेच्या मृत्यूच्या दिवशी यातील रक्कम वाटण्याची बैठक होणार होती. त्यामुळे पैशाचा अधिक असलेल्या जावयाने पैशाच्या वाटपावरूनच या वयोवृद्ध महिलेच्या डोक्याला गंभीर दुखापत करून केला आल्याचे समोर आले आहे. या खुनामध्ये आरोपी सुरेश पाटील याच्या साथीला आणखी कोण आहेत का? याचा शोध उरण पोलिस घेत आहेत.

# मोहोपाडा प्रबळजवळील रस्त्यावर अपघातांना निमंत्रण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

दांड-रसायनी रस्त्यावरील मोहोपाडा अचानक मैदानासमोरील प्रबळ स्कूल असून या शाळेत शिकण्यासाठी विद्यार्थ्यांची रेलचेल सुरू असते. शाळेजवळ दुचाकी, चारचाकी वाहने तसेच दुकांनाचे फलक रस्त्यावर आल्याने शाळेसमोरून रस्ता ओलांडताना तारेवरची कसरत करावी लागते.

मोहोपाडा प्रबळ शाळेसमोर रसायनीहून येताना शाळेसमोरील रस्त्याला गतिरोधक नसल्याने वाहने जोरात चालवली जातात. या रस्त्यावरुन अवजड वाहनांसह लहान मोठ्या वाहनांची चौवीस तास रहदारी सुरू असते. अरुंद झालेला रस्ता आणि वाढलेली रहदारी यामुळे अपघात झाल्यास किंवा कोणाची जिवितहानी झाल्यास त्याला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल नागरिक करत आहेत. हा रस्ता ओलांडताना लहानमोठे अपघात होत असल्याने प्रबळ शाळेजवळ दोन्ही बाजूने नव्याने गतिरोधक बसवावेत म्हणजे वाहनांच्या वेगाला पायबंद बसेल. यासाठी सा.बां.खात्याने लक्ष देण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

# गव्हाण कॉलेजमधील मुलींसाठी स्वसंरक्षणार्थ प्रशिक्षण वर्ग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये बदलापूर येथील शिवम चारिटेबल ट्रस्ट घ्या वतीने शनिवारी (दि.२२) इयत्ता ११ वी १२ वी मधील मुलींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षणाचे आयोजन केले होते.

शिवम चारिटेबल ट्रस्ट तर्फे विभूती सुर्वे, मैथिली अनिकेत जाधव तसेच कम्बॅक्ट खारघर या अकॅडमीचे प्रमुख अनिकेत जाधव आणि आरिफ शेख यांनी विशेष प्रशिक्षण विद्यालयातील मुलींना दिले. या वेळी किक बॉक्सिंग प्रॅक्टिकल सेल्फ डिफेन्स, नेक चोक, कॉलर ग्रेप,विपन्स या प्रकारांचे प्रात्यक्षिक दाखविले.

किक बॉक्सिंग प्रॅक्टिकल सेल्फ डिफेन्स, नेक चोक, कॉलर ग्रेप, विपन्स या प्रकारांचे प्रात्यक्षिक करून दाखविले. इयत्ता ११ वी १२ वी च्या मुलींनी यात सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख हर्षला पाटील यांनी केले. कार्यक्रमाची सांगता विद्यालयाचे क्रीडा शिक्षक सुरेश पारखे यांनी केले. प्रशिक्षणास विद्यालयाच्या प्राचार्या जे. एस. ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर आर. एस. भोईर, लाइफ वर्कर डी. के. म्हात्रे यांनी प्रोत्साहन दिले.



# बिर्ला कंपनीकडून तुपगावासाठी जलशुद्धीकरण केंद्र

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

तुपगांवमध्ये बिर्ला कार्बन कंपनी यांच्या संयोगाने तुपगांमध्ये जलशुद्धीकरण केंद्रासाठी पिण्याच्या पाण्याचा फिल्टर प्ल्याट बसविण्यात आला. या कार्यासाठी ज्यांनी विशेष प्रयत्न केले ते गावातील समाजसेवक दिलीप साळुंखे, सचिन कालेकर, अविनाश दळवी यांच्या सहयोगाने हे काम आपल्या गावामध्ये याच्या माध्यमातून झाले आहे. रविवारी (दि.२३) सकाळी १० वाजता या जलशुद्धीकरण केंद्राचे उद्घाटन तुपगाव गावचे लोकनियुक्त सरपंच रवींद्र लक्ष्मण कुंभार यांच्या हस्ते झाले.



या वेळी भारतीय जनता पक्षाचे आरोग्य सेल अध्यक्ष खालापूर तालुका विजय ठोसर यांनी या कामासाठी कार्यासाठी ज्यांनी सहकार्य केले अशा सर्व समाज सेवकांचे ग्राम पंचायतीचे व कंपनीचे ग्रामस्थांच्या वतीने आभार मानले. या वेळी ग्रामपंचायत सदस्य रोहिणी गुरव, कांता ताई नागावकर, गुरव समाज अध्यक्ष देविदास गुरव, मनोज गुरव, रमेश दळवी, कन्हैयालाल विश्वकर्मा, संजय गुरव, हनुमान गुरव, रचना गुरव, जनार्दन गुरव, मिलिंद शिंदे, अल्पेश दळवी तसेच गावातील ज्येष्ठ श्रेष्ठ मंडळी उपस्थित होते.

प्लान्टसाठी जय गावदेवी सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळाच्या वतीने पाच हजार रुपये आर्थिक सहकार्य देण्यात आले त्याचे देखील ग्रामस्थांच्या वतीने आभार मानण्यात आले. आत्ता पर्यंत बिर्ला कंपनीच्या माध्यमातून गावामध्ये विद्यार्थ्यांसाठी बस स्टॅन्ड करण्यात आलेले स्वामी समर्थ मठ, शंकर मंदिर, मारुती मंदिर येथे सौर दिवे बसविण्यात आतापर्यंत ३० लाख रुपयाची अंदाजे कामे बिर्ला कंपनीच्या संयोगाने करण्यात आले आहेत.

गावामध्ये खूप चांगले काम सरपंच व ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य व गावातील सर्व तरुण मंडळीकडून होत आहेत. त्याबद्दलदेखील समाधान व्यक्त करण्यात आले असेच कार्य पुढे गावांमध्ये होत राहो, अशा सदिच्छा देण्यात आल्या.

# एसकेएम फाउंडेशनतर्फे विद्यार्थ्यांचा गौरव

**उरण : वार्ताहर**

परभणी येथील एसकेएम फाउंडेशन संस्थेतर्फे रुद्रांश करिअर अकॅडमी जेएनपीटी, उरण यांच्या विद्यार्थांची आगामी येणारी पोलीस भरती, सैन्य भरती तसेच लेखी चाचणी व शारीरिक फिटनेस परीक्षा घेतली असता, पहिल्या तीन क्रमांकाच्या मानकरी स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

या वेळी भारत कास्यंपदकाचे मानकरी हरेश्वर ठाकूर उपस्थित होते. या वेळी त्यांनी आपल्या मार्गदर्शनात शरीरासाठी प्रात्यक्षिक महत्त्वाचे असल्याचे समजावून सांगितले. प्रशांत जेना तसेच अनुजेना मॅडम यांनी भगवद्गीतामधील काही उदाहरण देऊन मैदान कसे लढवायचे ह्याबाबत सांगितले. सोनल तांडेल ह्यांनी त्यांच्या रायगड जिल्हास्तरीय कराटे चॅम्पियनबाबत विद्यार्थ्यांमध्ये शिस्त असणे आवश्यक आहे, स्ट्रेचिंगबाबत महत्त्वाच्या टिप्स दिल्या. महाराष्ट्र पोलीस आकाश धोके यांनी पोलीस भरतीमध्ये कशी तयारी करावी, नियोजन कसे करावे, अभ्यास किती तास असावा, मैदानाची तयारी केल्यानंतर डेली डायट कसा असावा, कोणती पुस्तकं वाचावी याबद्दल माहिती दिली.



कार्यक्रमात प्रथम, द्वितीय आणि उत्कृष्ट पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे पुस्तक देऊन गौरविण्यात आले. यात साक्षी (प्रथम) वनिता आटपाडकर (द्वितीय) क्रमांकच्या मानकरी ठरल्या, तसेच ऋषिकेश कोळी, माया पायल रोशन व करण उत्कृष्ट पारितोषिकाचे मानकरी ठरले. त्यांचाही सन्मान करण्यात आला. या वेळी राजेश म्हात्रे नागरी संरक्षण दल पेण तालुका हे उपस्थित होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन राणी वडगावकर (सचिव), राहुल डाके (उपाध्यक्ष), विठ्ठल फड, अनिकेत गीते, सुग्रीम प्रजापति, ऋषिकेश गरकर ह्यांनी केले होते, आभार प्रदर्शन करत असताना संस्थापिका गुंजन निषाद त्यांनी व्यासपीठासोबत मुलांचे हे कौतुक केले.

# फ्रेंड्स ऑफ नेचर संस्थेतर्फे व्याख्यान

**उरण : रामप्रहर वृत्त**

भारतात सुमारे १४०० अशा पक्षांच्या प्रजाती आहेत या प्रजाती मात्र आजच्या काळात पर्यावरणास गौण मानून मानवाच्या अति हव्यासापोटी निसर्गाची अपरिमित हानी होत आहे. त्यात अनेक प्रजाती नष्ट होत चाललेल्या आहेत. ५ ते १२ जानेवारीपर्यंत पक्षी सप्ताह साजरा केला जातो.



महत्त्वाचा घटक म्हणजे पक्षी या पक्षांच्या विविध प्रजाती व पक्षी प्रजाती व त्यांचे अस्तित्व हा अतिशय ज्वलंत विषय आहे त्या संबंधी त्यांची माहिती व पक्षांचे संवर्धन ही काळाची गरज आहे. यासाठी फ्रेंड्स ऑफ नेचर(फॉन) उरणचे सदस्य व वन्यजीव अभ्यासक निकेतन ठाकूर यांचे आत्माराम ठाकूर मिशन संचलित जानकीबाई जनार्दन ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आवरे मधील आठवी नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी मुख्याध्यापिका निकिता म्हात्रे, सचिव वामन ठाकूर, अलका ठाकूर , प्रसाद ठाकूर सिंधू ठाकूर व आदिनाथ ठाकूर,रिना ठाकूर उपस्थित राहून फ्रेंड्स ऑफ नेचर फॉनचे कौतुक केले.

# नवीन पनवेलमध्ये प्रजापती समाजातर्फे परिषदेच्या तयारीसाठी बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रजापती समाज विकास मंडळ नोंदणीकृत, राष्ट्रीय सामाजिक संघटना, एनजीओची एक विशेष बैठक पनवेल येथे संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. भगवान दास प्रजापती यांच्या अध्यक्षतेखाली झाली.




११ जानेवारी २०२६ रोजी नवीन पनवेल येथील सेक्टर २ येथील आंध्र कला समिती सभागृहात होणाऱ्या २१व्या वार्षिक परिषदेचे सुरळीत आयोजन करण्यासाठी समित्या स्थापन करण्यात आल्या आणि जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या. परिषदेला उपस्थित राहणाऱ्या प्रमुख पाहुण्या आणि प्रमुख व्यक्तींबद्दल चर्चा करण्यात आली आणि प्रतिष्ठित मान्यवरांना, तसेच खासदार आणि मंत्र्यांना परिषदेला उपस्थित राहण्यासाठी आमंत्रित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

परिषदेत वधू-वरांचा परिचय, प्रजापती व्यवसाय/व्यावसायिक चर्चा आणि परिचय, महाराष्ट्रात ओबीसी अंतर्गत राज्याबाहेरील कुंभार/प्रजापतींसाठी आरक्षण, महिला स्वावलंबन आणि महिला सक्षमीकरण, बेटी बचाओ बेटी पढाओ, शैक्षणिक प्रगती, आर्थिक प्रगती, सामाजिक जागरूकता आणि राजकीय सहभाग, प्रतिभा करिअर मार्गदर्शन, प्रोत्साहन, प्रतिभा सन्मान पुरस्कार, प्रजापती समाज रत्न आणि प्रजापती गौरव सन्मान २०२५ विशेष पुरस्कार, सांस्कृतिक कार्यक्रम आणि संघटनेचा विस्तार या विषयांवर चर्चा केली जाणार आहे.

राष्ट्रीय अध्यक्ष सी.पी. प्रजापती, राष्ट्रीय मुख्य सरचिटणीस गजेंद्र प्रजापती, महाराष्ट्र राज्य युवा सेल अध्यक्ष विशाल प्रजापती, रायगड जिल्हा सरचिटणीस इंदर प्रजापती, पनवेल शहर अध्यक्ष राजेंद्र प्रजापती, पनवेल शहर सरचिटणीस संजय कुंभार, नवीन पनवेल अध्यक्ष गोवर्धन प्रजापती, लवकुमार प्रजापती, राकेश प्रजापती, अकादमी प्रजापती, अकादमी कुमार प्रजापती. बैठकीला कुलदीप प्रजापती, केदारकुमार प्रजापती, संजय प्रजापती आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# हरवलेले बालमन

अलीकडच्या काळात विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत आहे. कळत नकळत हातून एखादा गुन्हा घडला किंवा चूक नसताना भरडले गेल्यावरही आत्महत्या करणे चुकीचे व दुःखदच, परंतु हल्ली किरकोळ, क्षुल्लक कारणांवरूनही लहान मुले जीवनयात्रा संपवत असल्याच्या घटना घडू लागल्या आहेत. नागपूरमध्ये मोबाईल दिला नाही म्हणून आठवीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीने गळफास घेऊन आत्महत्या केली, ही घटना समाजाला अंतर्मुख करून टाकणारी आहे.

**आजची मुले तांत्रिकदृष्ट्या सक्षम आहेत, पण भावनिकदुष्ट्या अधिक नाजूक बनत चालली आहेत. नाही ऐकण्याची क्षमता त्यांच्यात कमी होत चालली आहे. लहान नकारही जीवन-मरणाचा प्रश्न वाटू लागतो. अपयश, दडपण, अपेक्षा, तुलना, यशाचे ओझे या सर्वांचा विषारी संगम मुलांच्या मनाचा तोल बिघडवतो. पालक नोकरीत व्यस्त, शाळेत स्पर्धा, समाजात तुलना आणि मोबाईल-सोशल मीडियाचा दृष्टीभ्रम या सगळ्यातून मुलांची खरी गरज एकच आहे ती म्हणजे कोणी तरी त्यांच्या भावना समजून घ्याव्या, पण मुलांच्या मनातील ताण, असुरक्षितता, भीती, एकाकीपणा याकडे एकंदर समाजाकडून कमी लक्ष दिले जाते. संवादाचा अभाव, कडकपणा, शिस्तीची अतिशयोक्ती, मुलांच्या भावनांकडे दुर्लक्ष आणि सर्वात घातक म्हणजे तुलना यामुळे मुलांच्या मनावर खोल जखमा होतात, कारण मुलं जिद्दी म्हणून वागत नाहीत, तर ती काहीतरी सांगू इच्छितात, पण शब्द सापडत नाहीत. शाळाही या संकटातून सुटलेल्या नाहीत. अभ्यास, प्रोजेक्ट, परीक्षा, टॉपर्सची स्पर्धा या साऱ्याचा ताण कमी करण्यासाठी शाळांमध्ये मानसिक आरोग्याविषयीच्या सुविधा फारच मर्यादित आहेत. काउंसलर, भावनिक शिक्षण, तणाव व्यवस्थापन-या गोष्टी अजूनही उपेक्षित आहेत. मोबाईल हा आज मुलांचा भावनिक आधार बनला आहे. जेव्हा पालक अचानक नाही म्हणतात, तेव्हा मुलं ते फक्त वस्तू न मिळाल्याचे दुःख मानत नाहीत, तर माझ्याशी अन्याय झाला, माझा आनंद हिरावला गेला अशी भावना मनात बाळगतात. तंत्रज्ञानाची ही भावनिक व्यसनाधीनता मुलांना अतिसंवेदनशील बनवत आहे. यामध्ये सोशल मीडियाने भर घातली आहे. रील्स, लाईक्स, फॉलोअर्स, तुलना या सर्वांनी मुलांच्या स्वमूल्यमापनाला धक्का बसतो. इतरांचे जीवन पाहताना त्यांना स्वतःचे आयुष्य अपूर्ण वाटू लागते. ही मानसिक अस्थिरता कुठेतरी साचत जाते आणि किरकोळ कारण पुरेसे ठरते. खरंतर प्रत्येक मुलाला दिवसभरात कमीत कमी १५ मिनिटे संवादाची गरज असते- दोष, तक्रार किंवा टीका न करता ऐकले जाण्याची. संवाद हा मुलांसाठी औषधासारखा असतो. मोबाईल देणे किंवा न देणे हा मुद्दा कधीच खरा प्रश्न नव्हता. खरी गरज असते संतुलनाची. मोबाईल कधी, किती आणि कशासाठी वापरायचा हे शिकवणे आवश्यक आहे तसेच मुलांना स्वतःचे कौशल्य, आवड, स्वभाव ओळखण्यासाठी जागा देणेही गरजेचे आहे. प्रत्येक मूल टॉपर नसते, पण प्रत्येक मूल काहीतरी खास नक्कीच असते. त्यांची वेगळेपणाची ओळख स्वीकारणे महत्त्वाचे आहे. शाळांनीही अभ्यासाबरोबरच मानसिक आरोग्य शिक्षणाला प्राधान्य द्यायला हवे. काऊन्सिलिंगचा विस्तार, तणाव व्यवस्थापन सत्रे, सहानुभूतीचे प्रशिक्षण हे शिक्षणाचा अनिवार्य भाग व्हायला हवे. शेवटी मुलांची आत्महत्या ही एका घराची नाही, तर संपूर्ण समाजाची शोकांतिका आहे. विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांना आळा घालण्यासाठी संवाद वाढवणे, प्रेम देणे, आणि मुख्य म्हणजे मुलांची मनं वाचावी लागतील. हा बदल घरातून, शाळेतून आणि समाजातून सर्वत्र सुरू झाला, तरच अशा शोकांतिका थांबतील!**

# कवी, कथाकार, कादंबरीकार केशव मेश्राम

मराठी भाषेतील लेखक, कवी, नाटककार आणि समीक्षक अशी केशव तानाजी मेश्राम यांची ओळख राहिलेली आहे. त्यांची आज जयंती. यानिमित्ताने त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा...

केशव मेश्राम सिद्धार्थ महाविद्यालय, मुंबई येथून एमए (मराठी) झाले. त्यांना प्रारंभी मोलमजुरीची हलकी-सलकी कामे करावी लागली. नंतर महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना त्यांनी रेल्वे खात्यात नोकरी केली. त्याच काळात 'रूपगंधा' नियतकालिकात काम केले. पुढे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण होताच रेल्वे खात्यातील नोकरीचा राजीनामा देऊन ते महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात मराठीचे अधिव्याख्याता म्हणून रूजू झाले. तेथील एक वर्षाच्या नोकरीनंतर त्यांनी मुंबई येथे महर्षी दयानंद सरस्वती महाविद्यालयात अध्यापनकार्य केले. मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागातही प्रपाठक व विभागप्रमुख म्हणून सेवा केल्यानंतर नोव्हेंबर १९९७मध्ये ते सेवेतून निवृत्त झाले.

वेगवेगळ्या साहित्यप्रकारांतून लेखन करणाऱ्या मेश्रामांचा मूळ पिंड कवीचा होता. 'कविता' हा त्यांचा विशेष आवडीचा साहित्यप्रकार. 'रहस्यरंजन' विशेषांकात त्यांची 'मेळा' ही पहिली कविता प्रसिद्ध झाली (१९५८). त्यानंतर त्यांनी सातत्याने काव्यलेखन केले. 'उत्खनन' (१९७७), 'जुगलबंदी' (१९८२), 'अकस्मात' (१९८४), 'चरित' (१९८९), 'कृतकपुत्र' (२००१), 'अनिवास' (२००५) हे त्यांचे काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले. डॉ. सुमतेन्द्र नाडिग यांच्या मूळ कन्नड भाषेतील चिंतनकाव्याचा त्यांनी 'दाम्पत्यगीता' हा मराठी भावानुवाद केला.

दलित कवितेच्या प्रारंभ काळातील एक प्रमुख कवी म्हणून त्यांचा उल्लेख होतो. सर्व प्रकारच्या अनुभवांना मोकळेपणाने सामोरी जाणारी त्यांची कविता असून पारंपरिक लयीतील तसेच मुक्तछंदात्मक लयीतील काव्यलेखनातून त्यांचे काव्यमूल्य सिद्ध होते. समाजातील दैन्य, दारिद्र्य, विषमता व जीवनाच्या सर्वच क्षेत्रांतील अनास्था भाव हे त्यांच्या काव्यलेखनाचे विषय होत. नव्या पिढीच्या ध्येयशून्य तडजोडीची वेदनाही त्यांच्या काव्यात उमटलेली दिसते. म्हणूनच 'निसर्गाच्या विविध कळा - त्यांतल्या सर्व तरल छटांसह रंगवणार्या मेश्रामांच्या लेखनात शहरी जीवनातील रूक्ष व कडवट अनुभव तीव्रपणे चित्रित झालेले आहेत,' असे शांता शेळके यांना वाटते.

सर्वच काव्यसंग्रहांतून सामाजिक दुःखाची आच व्यक्त होते. जीवनातील रूक्ष, कडवट अनुभव काव्यात मांडताना त्यांच्या शब्दांना तीक्ष्ण शस्त्राची धार येते.



ते वृत्तीने आत्मरत असले तरीही त्यांची सामाजिक बांधीलकीशी निष्ठा होती. 'उत्खनन', 'जुगलबंदी' या काव्यसंग्रहांमध्ये धर्मव्यवस्थेने लादलेल्या मानहानीच्या जीवनाविरुद्ध विद्रोहाचे भावप्रकटन आले आहे. 'चरित', 'कृतकपुत्र', 'अनिवास'मध्ये त्यांची प्रखर आंबेडकरवादी जाणीव व्यक्त होते. गतकाळाचे वास्तव नजरेसमोर ठेवून वर्तमानाला सामोरी जाणारी त्यांची कविता असून 'आत्मपीडेकडून आत्मशोधाचा प्रत्यय' हा त्यांच्या कवितेचा स्थायिभाव आहे.

'हकिकत' आणि 'जटायू' (१९७२) व 'पोखरण' (१९७९) या त्यांच्या प्रसिद्ध कादंबऱ्या आहेत. 'हकिकत'मध्ये 'स्व'चे वास्तवदर्शन, तर 'जटायू'मध्ये अंधश्रद्धेला बळी ठरणाऱ्या अस्पृश्यवर्गातील तरुणाच्या मनाची घुसमट दिसते. समाजव्यवस्थेतील जळजळीत अनुभवांची मांडणी त्यात आहे. 'हकिकत' आत्मनिवेदनाचा घाट असलेली, तर 'जटायू', 'आम्ही'च्या समूहभावाने निवेदित होत जाणारी अभिव्यक्ती. 'जटायू' हे एक मिथ आहे. (दुर्बल घटकांसाठी रक्तबंबाळ होणारा रामायणातील 'जटायू'-मिथ.) 'हकिकत आणि जटायू' ही कलाकृती आत्मकथन, स्वकथन, दीर्घकथा की कादंबरी?, असा प्रश्न पडतो, परंतु ही कलाकृती म्हणजे आत्मकथा निवेदन करणारी कादंबरीच होय.

'पोखरण' ही दुसरी कादंबरी. या कादंबरीत आर्य-अनार्य अशा दोन विचारसरणींची मांडणी केली आहे. धम्मिल हा आर्य संस्कृतीचा प्रतिनिधी. जामालिन ही अनार्यांचे प्रतिनिधित्व करणारी टोळी. टोळी समूहाने राहणारा आदिम समाज आपली वसाहत कशी तयार करतो आणि आपल्या संस्कृतीचे रक्षण कसे करतो याचे या कादंबरीत दर्शन होते. 'आदिम प्रवृत्तीच्या असंस्कृत लोकांतील आत्मशोधाच्या जाणिवेतून दलितत्वाचा शोध' हे या कादंबरीचे सूत्र आहे. यालाच 'पुरावास्तवाच्या शोधाचे' सूत्रही म्हणता येईल. या दोन्ही कादंबरी लेखनाच्या प्रयोगामुळे मेश्रामांचे मराठी दलित कादंबरी विश्वातील स्थान अढळ झाले आहे.

मेश्राम यांचे 'खरवड', 'पत्रावळ', 'धगाडा', 'मरणमाळा', आदि नऊ कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. या कथालेखनात सामाजिक विषमता, अस्पृश्यता, अन्याय-अत्याचार, अपमान, विटंबना, अवहेलना, गुन्हेगारी अशा वास्तवाचे चित्रण आहे. त्यातून दलितत्वाची जाणीव प्रामुख्याने अभिव्यक्त झालेली आहे.

याशिवाय 'सातपुड्यातील खजिना' (१९७८) हा त्यांचा बालकथासंग्रह प्रसिद्ध आहे. प्रा. म.द. हातकणंगलेकर यांनी मेश्रामांच्या निवडक कथांचा 'ज्वाला कल्लोळ' (१९९६) हा संग्रहही संपादित केला आहे. मेश्रामांच्या सर्वच कथांतून समाजवास्तवाचे दर्शन घडते.

'छायाबन' (१९७३), 'रुतलेली माणसे' (१९८२), 'गाळ आणि आभाळ' (१९७९), 'गळतीचे क्षण' (१९९७), 'ओलाव्याचे ठसे' (२००४) इत्यादी ललितगद्यसंग्रहातून दलित जीवनातील दुःखपूर्ण अनुभवाच्या आकांताची मांडणी असली तरी त्यात एक भावस्पर्शी काव्यात्मता आहे. हे ललितगद्य वाचताना 'गद्यकाव्य' वाचत असल्याचा प्रत्यय येतो. ह्या ललित निबंधात चिंतनशीलता, आत्मपरता, उत्कटता, कल्पनारम्यता व सौंदर्यदर्शन इत्यादी गुणांचा मेळ असल्याचे प्रत्ययास येते.

मेश्रामांची 'समन्वय' (१९७९), 'शब्दांगण' (१९८०), 'बहुमुखी' (१९८४), 'प्रश्नशोध' (१९७९), 'साहित्य-संस्कृती मंथन', 'साहित्य प्रवर्तन', 'प्रतिभा स्पंदने' आदी समीक्षेची ग्रंथसंपदा आहे. या समीक्षाग्रंथात संत साहित्य, दलित साहित्य, नवसाहित्य, आधुनिक साहित्य, ग्रामीण साहित्य, शाहिरी वाङ्मय, धर्म संकल्पना, समाज परिवर्तनाची बदलती दिशा, साहित्यातील तात्त्विक, सैद्धान्तिक व आस्वादनाच्या पातळीवरचे हे समीक्षालेखन आहे. त्यांची समीक्षादृष्टी जशी आस्वादकाची तशीच ती समाजचिंतकाचीही आहे. म्हणूनच त्यांच्या समीक्षालेखनात वाङ्मयाच्या निर्लेप आस्वादनाबरोबरच समाजशास्त्रीय, मानवतावादी, समतावादी, प्रबोधन, आणि परिवर्तनवादी अशाही वृत्तींचा आढळ होतो. 'समन्वय', 'बहुमुखी' तसेच 'विद्रोही कविता' या संपादित काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेतून त्यांचा 'काव्यविचार' प्रामुख्याने व्यक्त झाला आहे. 'डॉ. आंबेडकर चिंतन' (१९९२) व 'दलित साहित्य आणि समाज' (२००५) ही वैचारिक लेखनाची दोन पुस्तके त्यांनी लिहिली. 'डॉ. आंबेडकर चिंतन' या ग्रंथातून त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या व्यक्तित्व-विचाराचा वेध घेतला आहे. आंबेडकरी चळवळीचा ज्वलंत इतिहास असून 'दलित साहित्य आणि समाज' या ग्रंथातून दलित साहित्याच्या सामाजिक बांधीलकीविषयीची चर्चा-चिकित्सा आहे.

'विद्रोही कविता' (१९७८), 'वाङ्मयीन प्रवृत्ती : तत्त्वशोध' (२००७) ही संपादने त्यांनी केलेली असून, 'दलित साहित्यातील स्थितिगती' (१९७९) आणि 'नवी विद्रोही कविता' (२००६) ही संपादनेही त्यांनी अनुक्रमे उषा मा.देशमुख आणि डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या सहकार्याने केली आहेत. मुंबई साहित्य संघाच्या अखिल भारतीय साहित्य संमेलन विशेषांकाचे संपादनही त्यांच्या नावावर आहे (१९८६). ही सर्व संपादने त्यांच्या साक्षेपी संपादनाची साक्ष आहेत.

याशिवाय साहित्य - संस्कृती मंडळ, विश्वकोश निर्मिती मंडळ, कायदा व सल्लागार मंडळ इत्यादी मंडळांवर त्यांनी सदस्य म्हणून केलेले कार्य उल्लेखनीय असून महाराष्ट्र शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधन समितीवरही ते सदस्य होते. दूर शिक्षण संस्था, मुंबई विद्यापीठ: एमए (मराठी)च्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासपुस्तके तयार करवून घेणे आणि मार्गदर्शन करणे हेही कार्य त्यांनी सांभाळले तसेच जनता शिक्षण प्रसारक मंडळ, अलिबाग, जि. रायगड या संस्थेत समन्वयक म्हणून त्यांनी काम केले.

मेश्रामांनी अनेक साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद भूषविले. त्यात अस्मितादर्श लेखक-वाचक मेळावा (१९७८), मुंबई उपनगर साहित्य संमेलन, विलेपार्ले, मुंबई (२००१), कामगार साहित्य संमेलन-अकरावे, पिंपरी, चिंचवड, पुणे (२००४), मराठी कोकणी नवोदितांचे साहित्य संमेलन-नववे, पुणे (२००४), आणि अ. भा. मराठी साहित्य संमेलन, नाशिक (२००५) अशा काही महत्त्वाच्या साहित्य संमेलनांचा समावेश होतो. मेश्रामांना वाङ्मयीन योगदानासाठी विविध पुरस्कारही प्राप्त झाले. **-डॉ. शोभा रोकडे**



## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सअ‍ॅपमध्ये लवकरच येणार 'हे' जबरदस्त फीचर

मेसेजिंग आणि चॅटिंगसाठी तुम्ही जर व्हॉट्सअ‍ॅपचा वापर करत असाल, तर तुमच्यासाठी एक अत्यंत महत्त्वाची आणि आनंदाची बातमी आहे. ज्या फीचरची युजर्स गेल्या अनेक वर्षांपासून आतुरतेने वाट पाहत होते, तेच फीचर व्हॉट्सअ‍ॅप लवकरच आणण्याच्या तयारीत आहे. या नव्या फीचरच्या मदतीने, आता तुम्ही एकाच व्हॉट्सअ‍ॅपमध्ये अनेक अकाऊंट्स वापरू शकणार आहात आणि एका क्लिकवर त्यांच्यात स्विच करू शकणार आहात.




मेटाच्या मालकीचे व्हॉट्सअ‍ॅप सध्या या बहुप्रतिक्षित फीचरची चाचणी करत आहे. सध्या ही सुविधा केवळ व्हॉट्सअ‍ॅप बिझनेसमध्ये उपलब्ध होती किंवा युजर्सना एकाच फोनवर दोन अकाऊंट्स वापरण्यासाठी थर्ड पार्टी अ‍ॅप्स किंवा फोनमधील 'क्लोनिंग' फीचरचा वापर करावा लागत होता.

सध्या हे फीचर iOSच्या '२५.१९.२०.७४' बीटा टेस्टमध्ये काही निवडक युजर्सना दिसून आले आहे. या युजर्सना व्हॉट्सअ‍ॅपच्या सेटिंग्समध्ये Switch Accounts नावाचा एक नवीन पर्याय दिसत आहे. या फीचरमुळे एकाच स्क्रीनवर तुमच्याशी लिंक असलेले सर्व व्हॉट्सअ‍ॅप प्रोफाइल्स दिसतील आणि तुम्ही कोणत्याही अडचणीशिवाय एका अकाउंटमधून दुसऱ्या अकाउंटमध्ये तात्काळ स्विच करू शकाल. याआधी, युजर्सना वारंवार लॉग-इन आणि लॉग-आऊट करण्याची किचकट प्रक्रिया करावी लागत होती, जी आता पूर्णपणे संपुष्टात येणार आहे.


सध्या हे फीचर फक्त iOS बीटा व्हर्जनमध्ये दिसत असले तरी, व्हॉट्सअ‍ॅपचे अँड्रॉइड सपोर्ट नेहमीच जलद मानले जाते. तज्ज्ञांचे मत आहे की, iOSवरील चाचणी यशस्वी झाल्यानंतर हे फीचर लवकरच अँड्रॉइड बीटा युजर्ससाठी देखील उपलब्ध होईल.

व्हॉट्सअ‍ॅपकडून याबद्दल कोणतेही अधिकृत वक्तव्य आलेले नाही, त्यामुळे हे फीचर सर्वसामान्य युजर्ससाठी कधी रोलआऊट होईल याची निश्चित कालमर्यादा सांगता येत नाही, मात्र सध्या हे फीचर अगदी प्राथमिक चाचणी टप्प्यात असून लवकरच हे बदल युजर्सच्या भेटीला येतील, अशी आशा आहे.

# शिख समाजाचे नववे गुरू तेग बहादुर

## निमित्त

भारताच्या गौरवशाली इतिहासात असे अनेक क्रांतिकारक जन्माला आले, ज्यांनी आपल्या धर्म, संस्कृती, आदर्श आणि मूल्यांच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. या महापुरुषांपैकी नववे शीख गुरू तेग बहादुर सिंग यांचेदेखील नाव आहे. गुरू तेग बहादुर यांना 'हिंदची चादर' असेही म्हणतात. धर्म वाचवण्यासाठी त्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. आज त्यांची पुण्यतिथी आहे.




गुरू तेग बहादुर यांचा जन्म अमृतसर येथे २१ एप्रिल १६२१ रोजी माता नानकी आणि शिखांचे सहावे गुरू हरगोविंद यांच्या पोटी झाला. गुरू तेग बहादूर यांचे बालपणातील नाव त्यागमल होते. ते गुरू हरगोविंद साहिब यांचे धाकटे पुत्र होते. त्यांनी आपले प्राथमिक शिक्षण आपल्या भावांकडून घेतले. त्यांनी धनुर्विद्या आणि घोडेस्वारीचेही प्रशिक्षण घेतले होते. त्यांच्या शौर्याबद्दल असे म्हटले जाते की, एकदा ते कर्तारपूरच्या युद्धानंतर वडील गुरू हरगोविंद साहिब यांच्यासोबत किरतपूरला जात होते. त्या वेळी ते फक्त १३ वर्षांचे होते. मुघल सैन्याच्या एका गटाने त्यांचा पाठलाग केला आणि फगवाडाजवळील पलाही गावात त्यांच्यावर अचानक हल्ला केला. या युद्धात त्यांचे वडील गुरु हरगोविंद साहिब यांच्यासोबत गुरू तेग यांनीही मुघलांशी युद्ध केले. लहान वयातच त्यांचे धाडस आणि जिद्द यामुळे तेग बहादुर बनले. शीख धर्माच्या संदेशांचा प्रसार करण्यासाठी, गुरूंनी भारतभर प्रवास केला आणि अनेक उपदेश केंद्र स्थापन केली. त्यांनी पंजाबमधील चक-नानकी शहराची स्थापना केल्याची माहिती आहे, ज्याचा विस्तार नंतर दहावे नानक गुरु गोविंद सिंग यांनी श्री आनंदपूर साहिब शहरात केला.

गुरू तेग बहादूर यांचा अंत कसा झाला याच्या अनेक आवृत्त्या आहेत, परंतु हिंदूंसाठी त्यांचा मृत्यू झाल्यामुळे त्यांचे बलिदान एक प्रकारचे होते यावर जवळपास सर्वच जण सहमत आहेत. १६७५मध्ये जेव्हा गुरू तेग बहादूर यांना दिल्ली येथे फाशी देण्यात आली तेव्हा त्यांनी अखेरचा श्वास घेतला. मुघल सम्राट औरंगजेबने हे आदेश दिले होते. पंजाबच्या प्रदेशात शीख चळवळ वाढत होती आणि गुरू लोकांना न्यायपूर्ण समाजासाठी निर्भय राहण्यासाठी प्रोत्साहित करत होते. जो कोणाला घाबरत नाही किंवा कोणाला घाबरत नाही तो खरा शहाणा माणूस म्हणून ओळखला जातो, असे गुरू ग्रंथ साहिबमध्ये नोंदवलेले विधान आहे. शीख इतिहासकारांच्या मते, असे मानले जाते की तेग बहादूरने मुस्लिम राजवट आणि सम्राट औरंगजेब यांना सामाजिक-राजकीय आव्हान उभे केले होते.

गुरू तेग बहादूर यांनी केलेल्या बलिदानाच्या स्मरणार्थ शीख संस्कृतीत नववे नानक यांची पूजा केली जाते आणि २४ नोव्हेंबर हा गुरू तेग बहादूर यांचा हुतात्मा दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यांच्या बलिदानानंतर अनेक पंडितांनी शीख धर्म स्वीकारला. काश्मिरी ब्राह्मणांचं नेतृत्व करणाऱ्या किरपा राम यांनीही शीख धर्म स्वीकारला. शीख अध्येता गुरुमुख सिंह यांनी त्यांच्या 'गुरू तेग बहादूर द ट्रू स्टोरी' या पुस्तकात लिहिलंय की, गुरू तेग बहादूर यांच्या बलिदानाने बऱ्याच गोष्टी बदलल्या. यातून भारतीय उपखंडाचा इतिहास बदलला. मानवी हक्कांसाठी लढताना दिलेल्या बलिदानापैकी हे एक मोठे बलिदान होते. आणि इथूनच भारतातील बलाढ्य मुघल साम्राज्याच्या ऱ्हासाची सुरुवात झाली. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# थंडीत पाय दुखत असेल तर हे करा...

पाय गरम पाण्यात बुडवून ठेवणं हा उपाय सोपा वाटू शकतो पण शरीराला याचे बरेच फायदे होतात. आपले पाय दिवसभर आपल्या शरीराचा भार उचलतात, तसंच पायांनी आपण तासनतान उभं राहतो, चालतो. अशा स्थितीत शरीरासोबतच मनाला शांती मिळणंही गरजेचं असतं. नियमित याचा वापर केल्यानं अनेक आजारांपासून बचाव होतो.



गरम पाण्यात पाय ठेवल्यानं ब्लड सर्क्युलेशन चांगले होते, ताण-तणाव कमी होतो, थकवा दूर होतो. सेल्फ केअर रुटीनमध्ये या पद्धतीचा समावेश करू शकता. ज्यामुळे शरीराची हिलिंग प्रोसेस व्यवस्थित होईल. जर झोपताना तुमच्या पायांमध्ये वेदना होत असतील तर तुम्ही गरम पाण्यात पाय ठेवू झोपू शकता. ज्यामुळे तुमच्या पायांच्या नसांना आराम मिळेल आणि झोपही चांगली येईल.

गरम पाण्यात पाय बुडवून झोपल्यानं शरीराचं तापमान थोडं वाढते ज्यामुळे रक्तप्रवाह व्यवस्थित होतो, ज्यामुळे पायांच्या नसांमध्ये वेदना,ताण-तणाव कमी होतो. तुम्हाला दीर्घकाळ उभं राहण्याचं काम करायचं असेल तर ही हिलिंग थेरेपी तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते. गरम पाणी तुमच्या मांसपेशींना रिलॅक्स करते याशिवाय थकवा गायब करते.

पायांमध्ये पायांमध्ये सूज, वेदना होत असतील ही समस्या टाळता येऊ शकते. ज्यामुळे ताण-तणाव कमी होतो. कारण पायांना आराम दिल्यानं संपूर्ण शरीरावर याचा परिणाम होतो. हिवाळ्याच्या दिवसांत जर तुमचे पाय थंड राहत असतील तर ते गरम करण्यासाठी तसंच रक्तसंचार ठीक करण्यासाठी ते फायदेशीर ठरू शकते.

मीठ मिसळल्यामुळे गरम पाण्याचा परीणाम अधिक वाढतो. मिठातील मॅग्नेशियम आणि अन्य खनिजं त्वचेला आराम देतात तसंच सूज कमी करण्यास मदत करतात. यामुळे डिटॉक्सिफिकेशनमध्येही मदत होते. खासकरून पायांवर दुर्गंध येत नाही. मीठाचं पाणी पायांसाठी फायदेशीर ठरते. एप्सम सॉल्ट, सैंधव मिठाचा वापर उत्तम मानला जातो. रोज थंडीत गरम पाण्यात मीठ घालून २० मिनिटं पाय यात ठेवा. ज्यामुळे पायांना वेदनांपासून आराम मिळेल तसंच पायांना भेगासुद्धा पडणार नाहीत. ताप आल्यानंतर पाय गरम पाण्यात ठेवणं हा जुना उपाय आहे, ज्यामुळे शरीराचं तापमान संतुलित राहतं तसंच ताप हळूहळू कमी होऊ लागतो. तसंच शरीराच्या नसा सक्रिय होता. शरीराची ऊर्जा स्थिर राहते.

# परळीतील ट्रान्सफॉर्मर धोकादायक स्थितीत



## ◆लवकरात लवकर दुरुस्तीची मागणी

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

परळी विभागात असलेला एक ट्रान्सफॉर्मर सध्या अत्यंत धोकादायक स्थितीत असून, त्याचे संपूर्ण स्ट्रक्चर खराब झाले आहे. या ठिकाणी परिसरातील लहान मुले नेहमी खेळत असतात, त्यामुळे संभाव्य दुर्घटनेचा धोका सातत्याने निर्माण होत आहे.

काही दिवसापुर्वी ट्रान्सफॉर्मरवरील एक वायर अचानक तुटली आणि ती जमिनीवर कोसळली. सुदैवाने त्या वेळी मुले थोड्या अंतरावर असल्यामुळे कोणतीही जिवीत हानी झाली नाही. मात्र, ही घटना भविष्यातील गंभीर अपघाताची शक्यता अधोरेखित करणारी ठरली आहे.

स्थानिक नागरिकांनी याबाबत चिंता व्यक्त करत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. ट्रान्सफॉर्मरच्या आजूबाजूला कोणतीही संरक्षक जाळी किंवा इशारा फलक नसल्यामुळे नागरिक आणि विशेषतः लहान मुलांचे जीव धोक्यात आहेत.

या संदर्भात संबंधित वीज वितरण विभागाने तत्काळ दखल घेऊन ट्रान्सफॉर्मरची दुरुस्ती करावी, संरक्षक उपाययोजना कराव्यात आणि परिसर सुरक्षित करावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. प्रशासनाने वेळेवर पावले उचलली नाहीत, तर भविष्यातील दुर्घटना टाळणे कठीण होईल, असा इशाराही स्थानिकांनी दिला आहे.

# रोह्यात भाजप-शिवसेना युतीच्या उमेदवारांच्या प्रचाराला सुरुवात



**रोहे : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगर परिषदेतील प्रभाग क्रमांक नऊमधील भाजप-शिवसेना युतीच्या उमेदवाराच्या प्रचाराला रविवारी सकाळपासून सुरुवात झाली आहे. युतीतील प्रभाग क्रमांक ९ अ मधील उमेदवार जाधव सुप्रिया अनंत व प्रभाग क्रमांक ९ ब मधील उमेदवार चाफेकर रोशन विष्णु यानी प्रचाराला सुरुवात केली आहे.

या वेळी भाजप तालुकाप्रमुख अमित घाग, शिवसेना (शिंदे गट) शहर प्रमुख मंगेश रावकर, उमेदवार रोशन चाफेकर, सुप्रिया जाधव, श्रध्दा पडवळ, पी.व्ही सनीलकुमार, निलेश वारंगे, एडवोकेट सार्थक जाधव, ज्योती सनिलकुमार, अनिल घरजाळे, रिया कासार आदी उपस्थित होते.

प्रभाग क्रमांक ९ मध्ये भाजप शिवसेना युतीची राष्ट्रवादी पक्षाच्या विरोधात लढत आहे. या दोन्ही लढती काटे की टक्कर होणार असल्याचे बोलले जाते. रोहयात शिवसेना-भाजपचे कार्यकर्ते ताकतीने मैदानात उतरल्याने प्रभाग क्रमांक नऊ मध्ये दोन्ही उमेदवार आपल्या प्रचाराला रविवारी सकाळी सुरुवात केली आहे.

भाजप शिवसेनेचे कार्यकर्ते घरोघरी जात मतदारांना भेटत आहेत. गेली पाच वर्ष भाजप शिवसेनेने या प्रभागात चांगली तयारी केली असल्याचे दिसून येते. त्यामुळे ही लढत काटे की टक्कर होणार असल्याचे बोलले जाते.

# नवीन पात्रता प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया होणार सुरू

**रायगड : रामप्रहर वृत्त**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे नवीन पात्रता प्रमाणपत्र (LOI) देण्याव्यतिरिक्त उर्वरीत कामकाज सुरळीत सुरू असून लाभार्थ्यांना दिला जाणारा व्याज परतावा कोणत्याही अडथळ्याविना नियमितपणे वितरित केला जात असल्याची अधिकृत माहिती महामंडळाने यापूर्वी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. सप्टेंबर २०२५ अखेर होल्ड केलेली व स्थगित (ब्लॉक) केलेली प्रकरणे वगळता व्याज परताव्यासाठी दावा केलेल्या सर्व पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात व्याज परताव्याची रक्कम जमा करण्यात आली आहे.

काही माध्यमांमध्ये महामंडळाचे कामकाज बंद असल्याच्या प्रसारित झालेल्या बातम्यांवर महामंडळाने स्पष्टीकरण दिले आहे. पात्रता प्रमाणपत्र (LOI) संबंधीची प्रक्रिया काही तांत्रिक कारणांमुळे तात्पुरती स्थगित करण्यात आली होती, मात्र व्याज परतावा व बैंक मंजुरी प्रकरणांचे कामकाज सुरळीत सुरू आहे. जिल्हा समन्वयकांचा संपर्क क्रमांक www.udyog.mahaswayam.gov.in, प्रणालीवर उपलब्ध आहे. यापुढे नागरी सुविधा केंद्र वगळता, अन्य प्रकरणी एकच मोबाईल क्रमांक / लॉगीन करुन एकच प्रकरण दाखल करता येईल, अशी सुधारणा महामंडळाने प्रस्तावित केली आहे. पात्रता प्रमाणपत्र (LOI) च्या प्रक्रीयेमध्ये तांत्रिक सुधारणा पुर्ण करून, शक्य तेवढ्या लवकर नवीन पात्रता प्रमाणपत्र (LOI) सुरू करणार असल्याची माहिती व्यवस्थापकीय संचालक यांनी दिली. पात्रता प्रमाणपत्र (LOI)च्या प्रक्रीयेमध्ये तांत्रिक सुधारणा पुर्ण करून, शक्य तेवढ्या लवकर नवीन पात्रता प्रमाणपत्र (LOI) सुरू करणार असल्याची माहिती व्यवस्थापकीय संचालक यांनी दिली.

या योजनेविषयी अधिक माहितीसाठी जिल्हा समन्वयक अंजली पाटील व संकेत मोरे यांच्या भ्रमणध्वनी क्रं ९९२०४८९७९९/ ८१४४९६९२६६८ संपर्क साधावा.

# कर्जतमध्ये बँकांकडून जनजागृती

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील जनतेची कोणत्याही सायबर गुन्ह्यांमुळे फसवणूक होऊ नये आणि त्यांच्या कडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही होऊ नये. यासाठी जनजागृती मोहीम कर्जत तालुक्यात बँकांच्या वतीने राबविण्यात आली. उमरोली गावातील ग्रामस्थांनी या जनजगृती मोहिमेला मोठा सहभाग घेतला.



दक्षता जनजागृती सप्ताह निमित्ताने जनजगृती मोहीम तालुक्यातील उमरोली गावातील हनुमान मंदिरात आयोजित कार्यक्रमात राबविण्यात आली. या वेळी भ्रष्टाचार संदर्भात माहिती देण्यात आली तसेच आयडीबीआय बँकेच्या माध्यमातून अधिकाऱ्यांनीदेखील या बद्दल नागरिकांना जागृती निर्माण करून सतर्क राहण्याचे मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित होते. या संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा ऑल सोशल क्राइमकंट्रोल अँटी कॅरप्शन ऑर्गनायझेशन चे राष्ट्रीय उपाध्यक्ष ज्ञानेश्वर साळोखे, बँक असिस्टान जनरल मॅनेजर राजू रंजन, ज्युनिअर असिस्टान मॅनेजर निशांत म्हैसने, क्लार्क वैभव क्षीरसागर, बँक कर्मचारी संभाजी रसाळ, रायगड जिल्हा सदस्य संतोष पवार, माजी सरपंच महादेव लोंगले, नरेंद्र लोंगळे, सचिन लोंगले, समीर लोंगले, शिल्पा घारे. भावना घारे. माजी उप सरपंच गुलाब लोंगले, परेश लोंगले, गणेश लोंगले, सुनीता बुंधाटे, रामचंद्र घारे, विकास घारे,प्रवीण घारे, दिलीप लोंगले सुलोचना घारे, स्वप्नाली लोंगले, ग्रामस्थ उपस्थित होते.

ज्ञानेश्वर साळोखे यांनी यावेळी बोलताना 'आपण भ्रष्टाचार थांबवू शकतो ही आपल्या सर्वांची सामाजिक जबाबदारी आहे. दक्षता जनजागृती कार्यक्रमात. बँकेचे होणारे गैर व्यवहार, मोबाईल वर येणारे ओटीपी, लिंक, इतरस्त व्यक्तीचे, किंवा अनोळखी व्यक्ती, कंपन्यांचे कॉल यांपासून सावधानगी बाळगावी. आपली माहिती गोपनीय ठेवून आपण सतर्क जबाबदार नागरिक म्हणून आपल्या आजूबाजूच्या लोकांना ही माहिती द्वारे सतर्क राहण्याचे आवाहन केले पाहिजे. तर आयडीबीआय बँकेच्या माध्यमातून फ्री.के.वाय. सी.आणि झिरो बॅलन्स मध्ये बँक खाते खोलण्यात आले. या दक्षता जनजागृती कार्यक्रमास गावातील सर्व नागरिक ज्येष्ठ नागरिक, तरुण, महिला व आदिवासी महिला वर्ग उपस्थित राहून सर्वांनी मिळून कोणत्याही सरकारी कामासाठी लाच न देण्याची शपथ घेऊन कार्यक्रमास सहभागी झाले.

# 'आंबा उत्पादक शेतकऱ्यांना सुधारित प्रमाणकानुसार विमाभरपाई द्यावी'

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सन २०२४-२५ ची आंबा उत्पादक शेतकऱ्यांची विमा नुकसान भरपाई अजून पर्यंत मिळाली नाही, दुसरीकडे ३० नोव्हेंबर २०२५ ही सन २०२५-२६ चा प्रिमियम भरण्याची अंतिम मुदत आहे.



या पार्श्वभूमिवर २० नोव्हेंबर २०२५ रोजी रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी किसन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीची महत्वपूर्ण बैठक संपन्न झाली. रायगड जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्या सुधारीत प्रमाणकांनुसार विमा भरपाई तात्काळ देण्याचे निर्देश त्यांनी युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनीच्या राज्य व्यवस्थापकांना दिले. सदर फळ पीक विमा योजना राबविताना स्कायमेट प्रमाणकांचा वापर कंपनीने वेळोवेळी करावा जर अचूक प्रमाणकांवर नुकसान भरपाई दिली गेली नाही तर इथून पुढे संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात येतील अशी सक्त ताकिद ही त्यांना या वेळी दिली.

बैठकीस रायगड जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे, बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापक कुलकर्णी, कृषी विभागाचे सांख्यिकी अधिकारी शतानंद कोमटे, महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल, संघाचे पदाधिकारी व जिल्ह्यातील आंबा उत्पादनातील शेतकरी उपस्थित होते. बैठकित बोलताना चंद्रकांत मोकल यांनी मागील वर्षीचा आंबा हंगाम संपून ६ महिन्याचा कालावधी लोटला असून देखील विमा कंपनीकडून रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अजून पर्यंत नुकसान भरपाई मिळाली नाही.

दुसरीकडे दिवाळीपूर्वी निश्चित केलेली विमा रक्कम ही स्कायमेट कडून प्राप्त डाटा पेक्षा कमी होती. हा जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर अन्याय आहे असे सांगितले. त्यामुळे नव्याने पुर्नरतपासणी करुन अचूक विमा रक्कम निश्चिम करावी यासाठी कंपनीला १७/११/२०२५ रोजी शासनामार्फत पत्र पाठविण्यात आले. १ महिन्याचा कालावधी लोटला तरीदेखील कंपनीने 'अेडब्ल्यूएस ट्रिगर' प्रत्येक महसूलला काय लावले याची माहिती अजून पर्यंत जमा केली नाही ही गंभीर बाबही मोकल यांनी बैठकित मा. जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणली. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी त्याची तातडीने दखल घेतली. रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्रमियम दुप्पट असल्याने तो कमी करण्यात यावा यास देखील मा. जिल्हाधिकारी यांनी संमत्ती दिली.

# मोहोपाड्यात रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन

**मोहोपाडा :** दांड-रसायनी रस्त्यावरील टिसीआयसमोर अंबे स्मृति वसाहतीकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरावस्था झाल्याने या रस्त्यावरून प्रवास करताना विविध समस्यांना सामोरे जावे लागायचे, हि समस्या अंबे स्मृती ते लक्ष्मी वसाहतीतील नागरिकांनी माजी सरपंच संदीप मुंढे यांना सांगताच त्यांनी प्रयत्न करून पाठपुरावा करत रस्त्याचा प्रश्न मार्गी लावला.

अंबे स्मृतीसमोरील या रस्त्याचे गुरुवार, २० नोव्हेंबर रोजी सरपंच उमा मुंढे, सदस्या संगिता भोईर, सदस्या स्वप्नाली मैदर्गीकर यांच्या हस्ते भूमिपूजन करुन काम सुरू करण्यात आले. अंबे स्मृती वसाहत रस्त्याचे काम सुरू झाल्याने तेथील रहिवाशांना आनंदाचे वातावरण आहे. त्यांनी सरपंच उमा मुंढे, माजी सरपंच संदीप मुंढे, सदस्य संगीता भोईर, स्वप्नाली मैंदर्गीकर यांचे आभार मानले.



# दिव येथे चंपाषष्ठी उत्सव

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील दिव येथे चंपाषष्ठी उत्सव २४ नोव्हेंबर ते बुधवार २६ नोव्हेंबर पर्यंत साजरा करण्यात येणार आहे. २४ नोव्हेबर रोजी सकाळी ८ वाजता अभिषेक व आरती संध्याकाळी सहा वाजता सतत तीन दिवस हभप कुणाल ठाकूर व बाळ कीर्तनकार हभप ज्ञानेश्वरी ठाकूर यांचा श्री काळभैरव व लक्ष्मीनारायण हरिपाठ मंडळ देऊ यांचा हरिपाठ होईल त्यांना मृदुंग साथ मारुती ठाकूर यांची आहे रात्री ९ वाजता हभप वेदश्री वैभव ओक यांचे हरिदासी कीर्तन असून त्यांना हार्मोनियम साथ किशोर म्हात्रे दिव यांची व तबला साथ जितें म्हात्रे सर भाल विठ्ठलवाडी यांची आहे.

मंगळवार २५ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता आरती संध्याकाळी ६ वाजता हरिपाठ रात्री ९ वाजता हभप वेदश्री ओक डोंबिवली यांचे कीर्तन होईल रात्री ११ वाजता व्याघ्रेश्वर प्रासादिक संगीत भजन व नवतरुण मंडळ वाघविरा यांचे भजन होईल

बुधवारी २६ नोव्हेंबर सकाळी ९.३० वाजता हभप वेदश्री ओक यांचे पुष्पृष्टीचे कीर्तन होईल दुपारी १ वाजता संगीत रत्न भजन सम्राट विलास बुवा मनोरे पेण यांचे विठ्ठल रखुमाई मंडळाचे संगीत भजन होईल त्यांना पखवाज साथ संतोष म्हात्रे मळेकर वाडी यांची व तबला साथ पारस पाटील यांचीअसेल. दुपारी ३.३० विष्णुबुवा वांजेकर यांचे संगीत भजन त्यांना पखवाज साथ विशाल पाटील यांची असेल.

सायंकाळी ६.३० वाजता हभप वेदश्री ओक यांचे काल्याचे किर्तन होईल रात्री ९ वाजता बुवा कुंभार म्हात्रे बेनवले यांचे हनुमान प्रसादिक संगीत भजन मंडळाचे भजन होईल त्यांना पखवाज साथ आकाश पाटील तरणखोप यांची आहे या संगीत भजनानंतर कार्यक्रमाची सांगता होईल. या उत्सवाचा पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजनकांच्या वतीने करण्यात आले आहे.



# मोरे महाविद्यालयात जीवन कौशल्य, व्यक्तिमत्व प्रशिक्षण सत्र

**रोहा : प्रतिनिधी**

सुदर्शन केमिकल्सच्या 'सुधा सीएसआर' मार्फत राबविण्यात येत असलेल्या 'सु-उमेद - स्वप्नांना दिशा देणारी नवी उमेद' या उपक्रमाअंतर्गत एम बी मोरे फाऊंडेशनचे वरदा सुनील तटकरे महिला महाविद्यालय, धाटाव येथे शुक्रवारी 'जीवन कौशल्य व व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षण कार्यक्रमा'च्या दुसऱ्या सत्राचे आयोजन करण्यात आले.

प्रमुख मार्गदर्शक किशोर काळोखे यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास वाढविणे, सकारात्मक विचारसरणी विकसित करणे, योग्य निर्णयक्षमता निर्माण करणे आणि व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी आवश्यक जीवन कौशल्यांचे महत्त्व याविषयी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. प्रशिक्षणानंतर विद्यार्थ्यांनीदेखील या मार्गदर्शनाचा उपयोग स्वतःच्या सर्वांगीण विकासासाठी करण्याचा निर्धार व्यक्त केला.

या दुसऱ्या प्रशिक्षण सत्रात महिला महाविद्यालयातील ५८ विद्यार्थिनी आणि संस्थेच्या कनिष्ठ महाविद्यालयातील १२३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सुधा सीएसआरचे प्रतिनिधी श्री अमर चांदणे आणि सुदर्शन कंपनीचे कर्मचारी संग्राम पाटील उपस्थित होते.

प्रशिक्षण सत्रांचे नियोजन महिला महाविद्यालयाच्या 'महिला सक्षमीकरण समिती' (WEC) च्या प्रमुख प्रा. दीपाली वारंगे आणि सहायक प्रा. विजिता पडवळ यांनी केले.

# बेदरकार चालकांकडून लाखोंचा दंड वसूल

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**



जिल्ह्यात पर्यटन हंगाम सुरू असल्याने मोठ्या संख्येने पर्यटक दाखल होत आहेत. वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शनिवारी (दि.२२) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ३५४ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी या वाहनचालकांकडून तीन लाख ७१ हजार ९०० रुपये इतका दंड आकारला आहे. वाहतूक पोलिसांच्या या सुरू असलेल्या धडक कारवाईमुळे वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.


**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to the public at large that, I am investigating the right, title and interest of **M/S WISEWORLD DEVELOPERS LLP**, having its registered office at Flat No.19, Koteshwar Dham, Sanitorium Lane, Sadanand Road, Ghatkopar West, Mumbai 400086, to the property more particularly described in the Schedule hereunder written (hereinafter referred to as the "said Property").

All person/s having any claim in respect of the said Property or any part thereof by way of sale, exchange, gift, mortgage, security (collateral or otherwise), charge, lien, lease, tenancy, kul, trust, maintenance, inheritance, possession, license, succession, contract, memorandum of understanding, power of attorney, easement, right of way, occupation, family arrangement, settlement, award or decree of any court of law, lis-pendens, attachment, reservation, development right, FSI consumption, partnership, joint venture, joint development, development management or any liability or commitment or demand of any nature whatsoever or otherwise howsoever are hereby requested to make the same known in writing alongwith supporting documents to the undersigned at Off. No. 48, Krishna Apartment, Jai Ganeshji CHSL, Plot No.34, Sector 36, Kamothe, Navi Mumbai 410209 and/or email at nvdhongadi@gmail.com to the undersigned within 7 (seven) days from the date of publication hereof, failing which, the claim of such person/s will be deemed to have been waived and/or abandoned.

**SCHEDULE**

All that piece or parcel of non-agricultural land bearing Plot No. 3 admeasuring approximately 490.00 sq. mtrs. as per NA layout, out of the NA layout of Gut no. 102, 140 and 141, situate at Village Dahivali Tarfe Need, Taluka Karjat, District Raigad, Maharashtra falling within limits of Karjat Municipal Council and bounded as follows that is to say:

On or towards the North by : 12 Mtr. wide D.P. Road
On or towards the South by : Gut No. 98
On or towards the East by : Gut No. 98 and Plot 2
On or towards the West by : Open Space 2

Dated this ------- th day of November, 2025

sd/-
**Navin V. Dhongadi**
**Advocate**



**जाहीर नोटीस**

सर्व संबंधीतास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत बोजावीरहीत तीचे मालक १) श्री. मोहम्मद अदिल पटेल, रा. फ्लॅट नं. ५०४, आदिल टॉवर, बंदर रोड, जुने पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड व २) श्री मोहम्मद शमीम अब्दुल गफुर सुरमे, रा. घर क.३०५, एम.जी. रोड, कच्ची मोहल्ला, मुस्लीम नाका, जुने पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, यांचेकडून विकसनाकरीता घेण्याचे ठरविलेले आहे. त्याबाबतचा आवश्यक तो करार माझे अशिलांनी सदरहु मालकांबरोबर केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - अरिवली, ता. पनवेल, जि. रायगड,**
**येथील खालील जमीन मिळकत**

| गट क./उपविभाग क्र. | क्षेत्र चौ. मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १३८/१ | ५९१ | ५९.१०/- |
| १३८/२' | ५१० | ५१/- |
| १३८/३ | ५०५ | ५०.५०/- |
| १३८/४ | ५२० | ५२/- |
| १३८/५ | ६२६ | ६२.६०/- |
| १३८/६ | ६०२ | ६०.२०/- |
| १३८/७ | ५८५ | ५८.५०/- |
| १३८/८ व ९ | १०४६ | १०४.६०/- |
| १३८/१० | ५१८ | ५१.८०/- |
| १३८/११ | ५५१ | ५५.१०/- |
| १३८/१२ | ५७० | ५७/- |
| १३८/१३ | ५६८ | ५६.८०/- |
| १३८/१४ | ६४३ | ६४.३०/- |
| १३८/१५ | ५१८ | ५१.१८/- |
| १३८/१६ | ४४७ | ४४.७०/- |
| एकुण | ८८०० | |

सदरहू मिळकतीशी अथवा तिच्या कोणत्याही भागाबाबात कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त, कुळ, वहीवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली नमूद केलेल्या पत्यावर कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात. वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहु मिळकत निर्वेध, निर्दोश व बोजारहीत असल्याचे गृहीत धरून व कोणत्याही इसमाचे हक्क असल्यास ते सोडून दिले आहेत असे समजले जाईल आणि आमचे अशिल विकसनाचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणा-या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी

**नवी मुंबई**
**दिनांक १४/११/२०२५**

**सही/-**
**अॅड. नवीन वि. धोंगडी**
**पत्र व्यवहाराचा पत्ता- फ्लॅट नंबर डी-४०१, ग्रिनस्केप रॉयल को. ऑप. ही.सी., प्लॉट नं. २५, सेक्टर ७, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९-**
**मो.क. ९००४०८७८७३**

# झुकलेल्या झाडामुळे वाहनचालकांना धोका

## वाशी-कोपरखैरणे रस्त्यावरील प्रकार

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी-कोपर खैरणे रस्त्यावरील एका धोकादायकपणे झुकलेल्या झाडामुळे सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हरित कार्यकर्त्यांनी इशारा दिला आहे की दुर्लक्षित वाढ आता वाहनचालक आणि पादचाऱ्यांसाठी थेट धोका आहे.



वाशी-कोपर खैरणे रस्त्यावर सेक्टर-१७ बस स्टॉपजवळ असलेले हे पूर्ण वाढलेले झाड जवळजवळ ४५ अंशाच्या कोनात वाकले आहे आणि कॅरेजवेमध्ये पसरले आहे. मी ज्या बसमध्ये प्रवास करत होतो ती जवळजवळ चुकली होती. ड्रायव्हरने वेळीच प्रतिक्रिया दिल्यानेच आम्ही वाचलो, असे सर्वप्रथम अलार्म वाजवणारे कार्यकर्ते मधु शंकर यांनी आठवले. 'ह्यूमन चेन ऑनलाइन' फोरमचे संयोजक बी.एन. कुमार यांनी नवी मुंबई महानगरपालिका (मनपा) अधिकाऱ्यांना तातडीने इशारा दिला आणि झाडाला स्पष्ट आणि सध्याचा धोका म्हटले जे कधीही या टप्प्यावर पोहोचू दिले जाऊ नये. या घटनेला नागरी चुकांची आठवण करून देणारी गोष्ट म्हणत कुमार यांनी एक जुनी म्हण उद्धृत केली: झाड लहान असतानाच सरळ केले जाते. त्यांनी आणि इतर पर्यावरणवाद्यांनी अशाच प्रकारच्या धोक्यांची ओळख पटविण्यासाठी शहरव्यापी वृक्ष तपासणीची मागणी केली आहे. त्यांनी रोपांची चांगली देखरेख करण्यासाठी आणि त्यांना सरळ वाढण्यासाठी आधार देण्यासाठी मदतीचा वापर करावा अशी मागणी केली आहे. हे आश्चर्यकारक आहे की मानपा किंवा सिडकोने यापूर्वी हस्तक्षेप केला नव्हता. रोपांच्या टप्प्यावर थोडेसे लक्ष दिल्यास आजचा धोका टाळता आला नसता, असे ते म्हणाले.

कार्यकर्त्यांच्या मते, साधी छाटणी ही समस्या सोडवणार नाही. खोड रस्त्याकडे झुकल्याने, संभाव्य अपघात टाळण्यासाठी आता झाडाचे स्थानांतर करावे लागेल किंवा सर्वात वाईट परिस्थितीत, ते काढून टाकावे लागेल. दुचाकीस्वारांना सर्वात जास्त धोका असतो, तर जाणाऱ्या वाहनांवर पूर्णपणे कोसळणे ही तितकीच गंभीर शक्यता आहे.

कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की, चिंता ही झाडांबद्दल नाही तर खराब देखरेखीबद्दल आहे. नवी मुंबईतील वृक्षाच्छादन हे प्रति व्यक्ती तीन झाडांच्या मूलभूत नियमापेक्षा खूपच कमी आहे. ज्या वेळी आपण हिरवेगार क्षेत्र वाढवायला हवे होते, त्याऐवजी आपल्याला उपटून टाकण्याची चर्चा करावी लागत आहे, असे आरटीआय कार्यकर्ते अनरजीत चौहान यांनी अधिकाऱ्यांना या समस्येकडे गांभीर्याने पाहण्याची विनंती केली.

# न्हावाशेवा पोलिसांतर्फे विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे मार्गदर्शन

**उरण : प्रतिनिधी**

न्हावाशेवा वाहतूक शाखेचे वतीने नुकतेच उलवे नोड येथील मोरू नारायण म्हात्रे विद्यालयातील विद्यार्थ्यांना रस्ते वाहतूक नियमन व सुरक्षा मार्गदर्शन करण्यात आले.

यामध्ये सुमारे १२४ शालेय विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्यात आले. या प्रबोधनपर कार्यक्रमात वाहन चालवितांना सर्वजण आपल्या घरातील पालक आणि हेल्मेटचा वापर करावा.याशिवाय कोणीही मद्यपान करून गाडी चालवू नये, वाहतूकीचे सर्व नियम पाळणे तसेच रोडवर अपघात झाल्यास जखमींना तात्काळ हॉस्पिटलमध्ये घेऊन जाण्याची मदत करावी.



तसेच ११२ या पोलिसांच्या हेल्पलाईनला फोन करून अपघाताची माहिती जवळच्या वाहतूक पोलिस चौकी व पोलीस ठाण्याला कळवतील तसेच १०८ क्रमांकावर फोन करून म्बुलन्स बोलवावी यासह वाहतूकीच्या बहुतांशी नियमांबाबतच्या सूचना विद्यार्थ्यांना देऊन प्रबोधन करण्यात आले आहे. न्हावाशेवा वाहतूक विभागाच्या वतीने मोरू नारायण म्हात्रे विद्यालय कोपर उलवे नवी मुंबई येथे न्हावा शेवा वाहतूक शाखेच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती वैशाली गलांडे यांच्यासह पोलीस हवालदार किरण म्हात्रे इतर तसेच मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी सहभागी विद्यार्थ्यांची समुपदेशन करीत पालकांना आवाहन करण्याची सूचना करण्यात आली आहे.

# नेरूळमध्ये तीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्र होणार

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरुळ सेक्टर ८मधील उपआरोग्य केंद्र निर्माण करण्यासाठी नवी मुंबई मनपा आरोग्य विभागाने अखेर हिरवा कंदील दिला आहे तर नेरुळ सेक्टर १६, १८, आणि सारसोळे सेक्टर ६, ४ मधील गरजू नागरिकांना तात्काळ आणि आपल्या परिसरात आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी यासाठी उपआरोग्य केंद्र उभारण्याची प्रक्रिया अंतिम टप्यात आहे. भाजपचे माजी नगरसेवक सुरज पाटील यानी सदर केंद्र उभारण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता.

नेरुळ क्षेत्र २आणि ३ मधील विविध १० सेक्टर्स आणि ३ गांवा मधील गरजू नागरिकांना प्राथमिक आरोग्य सेवा उपचारासाठी पूर्वी नेरुळ पूर्व भागात नेरुळ रेल्वे स्टेशन समोरील स्व. मीनाताई ठाकरे हॉस्पिटल मध्ये जावे लागत होते. या ठिकाणी उपचारासाठी जाणे सामान्य रुग्णांना अधिक खर्चिक होते. याशिवाय नेरुळ विभागातील मनपाचे एकमेव हॉस्पिटल असल्याने तिथं रुग्णांची मोठी गर्दी असल्याने रुग्णास तासनतास उपचारासाठी वाट पहात रांगेत उभे राहावे लागत होते. कालांतराने नेरुळगांव आणि कुकशेत गांव इथं प्राथमिक आरोग्य केंद्र निर्माण झाली, मात्र इथं उपचारासाठी येणे नेरुळ सेक्टर ८,२ १०, १८, १६, आणि सेक्टर ६ आणि ४ मधील रुग्णास विशेषतः जेष्ठ नागरिक, गरोदर महिला आणि लहान बालके यांच्यासाठी खूप त्रासदायक आणि खर्चिक होते. सदर बाब लक्षात घेता येथील स्थानिक गरजू रुग्णांना तत्काळ आणि जवळच प्राथमिक उपचार मिळावेत यासाठी माजी नगरसेवक सुरज पाटील मागील दोन वर्षापासून सातत्याने पाठपुरावा करीत होते.

अखेर नवी मुंबई मनपा आरोग्य विभागाने पाथमिक आरोग्य उपकेंद्र निर्माण करण्यासाठी हिरवा कंदील दिला असल्याने गरजू नागरिकांना आता आपल्या परिसरात आरोग्य सेवा मिळणार आहे. तसेच नेरुळ क्षेत्र ३ मधील सेक्टर १६ आणि १८ तसेच सारसोळे सेक्टर ६ मधील नागरिकांसाठी प्राथमिक आरोग्य उपचार उपकेंद्र निर्मिती प्रक्रिया अंतिम टप्यात आहे.

# सायबर फसवणुकीविरोधात पोलिसांची जनजागृती

**नवी मुंबई : बातमीदार**

ज्ञानदीप शाळेत एन आर आय पोलीस ठाणे यांच्या मार्फत सेबीकडून प्राप्त झालेल्या अनधिकृत डिजिटल लेंडिंग ॲप व कंपनी यांच्या माध्यमातून पालक, मध्यमवर्गीय, सेवानिवृत्त, वयोवृद्ध व विद्यार्थी यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत आहे.

याबाबत पालकांसाठी मार्गदर्शन शिबिर आयोजित केले होते. अनधिकृत डिजिटल लेंडिंग ॲप व कंपनीबाबत काही माहिती असल्यास तात्काळ पोलीस ठाणे येथे माहिती द्यावी. तसेच सदर कंपन्यांमध्ये कोणत्याही प्रकारची गुंतवणूक करण्यात येऊ नये. सदर कंपन्याबाबत पालकांमध्ये जनजागृती करण्यात आली.



सायबर गुन्हेबाबत एन आर आय पोलीस ठाणे येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांनी पालकांना मार्गदर्शन केले. शिबिरात पालक आणि शिक्षक वर्ग उपस्थित होता. संस्थेचे अध्यक्ष रविंद्र नाईक, माध्यमिक मुख्याध्यापक रत्नाकर तांडेल, प्राथमिक मुख्याध्यापक बंकट तांडेल आणि पोलीस कर्मचारी हेमंत लेंगडे उपस्थित होते.

# नवी मुंबई पालिका शिक्षण विभागातर्फे कार्यशाळा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई पालिका शिक्षण विभागाच्या वतीने महापालिका आयुक्त डॉ कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आज वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृह येथे 'नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण: शिक्षकांसाठी संधी व आव्हाने' या विषयावर विशेष व्याख्यानसत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास शहरातील सर्व व्यवस्थापनांच्या व माध्यमांच्या शाळांचे मुख्याध्यापक आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या विशेष उपक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून चेंबूर येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य आणि मुंबई विद्यापीठाचे असोसिएट डीन डॉ. चंद्रशेखर चक्रदेव उपस्थित होते. त्यांनी आपल्या व्याख्यानातून नवीन शैक्षणिक धोरणाची उद्दिष्टे स्पष्ट करतानाच यामुळे शिक्षकांसमोर निर्माण होणाऱ्या आव्हानांचे संधीमध्ये रूपांतर कसे करावे यावर सखोल मार्गदर्शन केले. बदलत्या काळात शिक्षकांनी स्वतःला अद्ययावत ठेवणे किती गरजेचे आहे हे त्यांनी सोदाहरण पटवून दिले.

या कार्यक्रमात 'प्रथम' संस्थेच्या फरीदा लांबे यांनीदेखील ऑनलाईन उपस्थित राहून शिक्षकांशी थेट सुसंवाद साधला. त्यांनी शिक्षकांच्या प्रश्नांची उत्तरे दिली आणि विद्यार्थी घडवताना प्रत्यक्ष येणाऱ्या व्यावहारिक अडचणींवरही चर्चा केली.हा अत्यंत महत्त्वाचा उपक्रम नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या उपायुक्त संघरत्ना खिल्लारे यांच्या नियंत्रणाखाली आयोजित करण्यात आला होता. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात या कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. याप्रसंगी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे साहेब यांनी उपस्थित राहून शिक्षकांशी संवाद साधला.

कार्यक्रमाची सांगता करताना आयुक्तांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर देऊन त्यांचे सातत्याने मूल्यमापन होण्याची गरज विशद केली. त्यादृष्टीने शिक्षण प्रणालीमध्ये सुधारणा करणे, शिक्षकांची कौशल्ये वाढविणे आणि विद्यार्थ्यांना आधुनिक युगातील आव्हानांसाठी तयार करणे हे या नवे शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे हे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यशाळेस नवी मुंबईतील प्राथमिक, माध्यमिक आणि कनिष्ठ महाविद्यालयांमधील सर्व व्यवस्थापन व माध्यमांचे मुख्याध्यापक आणि शिक्षक प्रतिनिधी उपस्थित होते.

# घणसोलीतील ओम साई सोसायटीत महानगर गॅस कनेक्शन कामाचा शुभारंभ

**नवी मुंबई : बातमीदार**

घणसोली सेक्टर-१ येथील ओम साई सहकारी गृहनिर्माण संस्था येथे, माजी खासदार संजीव नाईक यांच्या हस्ते महानगर गॅस कनेक्शनच्या कामाचा शुभारंभ झाला.

अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला महानगर गॅस कनेक्शनचा विषय पाठपुराव्यामुळे अखेर मार्गी लागला आहे. त्यामुळे आता सिलेंडर ने आण करण्याचा त्रास नागरिकांचा संपणार आहे. सिलेंडरमुळे अनेकदा असलेला धोका, पाईपलाईन कनेक्शनमुळे संपूर्णपणे मिटणार असून, नागरिकांना सुरक्षितता लाभणार आहे. या वेळी समाजसेवक कृष्णा पाटील, सुनिल मस्कर, राजू थोरात, समाजसेविका निर्मला पाटील, निर्मला पांडे, व सोसायटीतील पदाधिकारी राजेंद्र मुंगळे, संजय पाटील, रुपेश पाटील, विकी राठोड, तेजस थोरात, योगेश पाटील, सोसायटीतील नागरिक आणि महानगर गॅसचे अधिकारी सुनिल केसरकर उपस्थित होते.



# विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वासांबे (मोहोपाडा) जिल्हा परिषद विभागातील नढाळ येथील एचडी पाटील इंग्लिश मिडीयम स्कूल आणि संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान आयोजित विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची जोपासना करण्यासाठी चौथी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी निरनिराळ्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

यावेळी इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी फॅन्सी ड्रेस (रामायणातील पात्रे) वेश परिधान केल्याने जणूकाही खऱ्या रामायणातील पात्रांचे दर्शन झाले. यात प्रियाल अमित राऊत हिने रामायणातील पात्रांचा आकर्षक वेश परिधान केला होता. तसेच इयत्ता पाचवी साठी संतकथा, इयत्ता सहावीसाठी चित्रकला (रामायणातील पात्रे, प्रसंग) इयत्ता सातवीसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा, महाभारत, इयत्ता आठवीसाठी निबंध स्पर्धा आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एचडी पाटील इंग्लिश मिडियम स्कुलच्या मुख्याध्यापिका निशा श्रीवास्तव -पोलेकर, शालेय शिक्षक व उपस्थितांनी अथक परिश्रम घेतले.

# पूरग्रस्त विद्यार्थ्यांना सुधागड विद्यासंकुलाची शैक्षणिक मदत

**कळंबोली : बातमीदार**

नुकत्याच परतीच्या मान्सन पाऊसाने महाराष्ट्रातील घाटमाथ्यावरील अनेक जिल्हांना झोडपून काढून पूरग्रस्त वातावरण निर्माण केले होते. अशातच या पाऊसाने बीड जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये व विद्यार्थ्यांच्या घरांमध्ये पाणी शिरून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्यांचे नुकसान झाले होते. याची जाणीव ठेवून सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र पालवे यांनी शाळेतील विद्यार्थी व शिक्षक-शिक्षेत्तर कर्मचारी यांना शैक्षणिक साहित्य जमा करण्याचे आवाहन केले होते. त्या प्रमाणे विद्यार्थी व शिक्षक-शिक्षेकेत्तर कर्मचारी यांनी शैक्षणिक साहित्य जमा केले. ते शैक्षणिक साहित्य बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉनसन यांच्याकडे नुकतेच सुपुर्द केले.



कळंबोली येथील सुधागड विद्या संकुल नेहमीच राष्ट्रीय आपत्ती मध्ये मदत करण्यात पुढे असते. या वर्षी परतीच्या मान्सून पर्जन्याने बीड जिल्ह्यातील नागरिकांची शेती, घरे दारे, व्यवसाय यांचे अतोनात नुकसान झाले. महाराष्ट्र शासन त्याच बरोबर विविध संस्था - संघटना यांनी मुलभूत गरजा असणाऱ्या वस्तू पूरग्रस्थांना पोहचवल्या मात्र शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक साहित्याचे झालेले नुकसान त्या मुळे त्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणूनच संकुलाचे प्राचार्य राजेंद्र पालवे यांनी विद्यार्थी, शिक्षक व स्वतः शैक्षणिक साहित्य जमा केले.

या मध्ये खोडरबरपासून ते दप्तरापर्यंत साहित्याचे ३०० किट तयार करून ते २४ मोठ्या बॉक्स मध्ये टाकून बीड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या महसूल तहसिलदार नरेंद्र कुळकर्णी यांच्या मार्फत बीड जिल्हाधिकारी विवेक जॉनसन यांच्या कडे सुपुर्द केले. या वेळी जिल्हाधिकारी जॉनसन यांनी सुधागड विद्या संकुलाचे प्राचार्य राजेंद्र पालवे, विद्यार्थी व शिक्षक-शिक्षेकेत्तर कर्मचारी यांचे कौतुक करून तसे कौतुक प्रमाणपत्र देवून आभार हि मानले.

# खारघर येथे भारतातील सर्वात मोठ्या बालकर्करोग निवासस्थानाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

टाटा मेमोरियल सेंटरच्या ACTREC यांच्या सहकार्याने सेंट जूड इंडिया चाइल्डकेअर सेंटर्सने खारघर येथे होम अवे फ्रॉम होम' सुविधेचे उद्घाटन केले. ही १२ मजली, २३४ युनिट्सची इमारत टाटा मेमोरियल सेंटरचे संचालक डॉ. सुदीप गुप्ता यांच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले. ही सुविधा दरवर्षी बालकर्करोगाशी सामना करणाऱ्या ७०० हून अधिक कुटुंबांना मोफत व स्वच्छ निवास उपलब्ध करून देईल. पुढील २० वर्षांत ही सुविधा अंदाजे १४,००० कुटुंबांना मदत करेल अशी अपेक्षा आहे.



बालकर्करोगाचे उपचार अनेक वर्षे चालू शकतात आणि त्यासाठी वारंवार फॉलो-अपची गरज भासते. उपचारासाठी हजारो किलोमीटर प्रवास करून मुंबईत येणाऱ्या कुटुंबांसाठी राहण्याची व्यवस्था करणे ही एक मोठी अडचण असते. सेंट जूड्समध्ये राहणाऱ्या कुटुंबांना त्यांचे मूल पूर्णपणे कॅन्सरमुक्त होईपर्यंत सुरक्षित राहण्याची हमी दिली जाते. ही नवी सुविधा कॅन्सरवर उपचार घेणाऱ्या कोणत्याही मुलाला सुरक्षित आणि काळजी घेणारी राहण्याची जागा मिळालीच पाहिजे, या सेंट जूड्सच्या वचनाची साक्ष आहे. परवडणारी राहण्याची सोय नसल्यामुळे अनेक कुटुंबे उपचार अर्धवट सोडतात. ही सुविधा ते कमी करण्यात मोठी मदत करेल. टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या माहितीनुसार, सेंट जूड्सच्या केंद्रांमुळे उपचार अर्धवट सोडण्याचे प्रमाण २००० च्या सुरुवातीला ३०% पेक्षा जास्त होते, ते आता ५% पेक्षा कमी झाले आहे.

या सुविधेत लायब्ररी, क्लासरूम, स्किलिंग सेंटर आणि 'सेंटर ऑफ एक्सलन्स' असेल, जे इतर स्वयंसेवी संस्थांना देशभरात 'होम अवे फ्रॉम होम' सारखी केंद्रे उभारण्यासाठी आणि चालवण्यासाठी प्रत्यक्ष प्रशिक्षण देईल.

# नेरे येथे बसथांब्यांचे लोकार्पण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील नेरे विभागात दोन नवीन बसथांब्यांचा लोकार्पण सोहळा शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांच्या हस्ते पार पडला.

शिवसेनेचे पनवेल तालुका संघटक दिनेश मांडवकर, उप तालुका प्रमुख दुंदरे ग्रामपंचायत सदस्य विश्वास पाटील, नेरा विभाग प्रमुख विद्याधर चोरघे यांच्या पाठपुराव्यातून शांतीवन, नॅचरल होम सोसायटी नेरे या दोन ठिकाणी दोन नवीन बसथांबे बांधण्यात आले. नेरे येथील कार्यक्रमादरम्यान अनेक कार्यकर्त्यांचा शिवसेनेत पक्ष प्रवेश करण्यात आला. या वेळी पनवेल तालुकाप्रमुख रूपेश ठोंबरे, बाळासाहेब पगारे, कैलास माळी, राकेश भोईर, प्रशांत कदम, प्रणव कारखानीस, सुकेश भोपी, अनिल निंबाळकर, सुरज कर्णूक, सुप्रिया मांडवकर यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.



# पालीत मालमत्ता करवाढीला स्थगिती

## नगरपंचायतीकडून जनहिताचा निर्णय; नागरिकांमधून समाधान व्यक्त




**पाली : प्रतिनिधी**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली नगरपंचायतीने लोकभावना लक्षात घेऊन सन २०२५-२६साठी केलेली करावाढ अखेर स्थगित केली आहे. त्यामुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

या अनुषंगाने पाली नगरपंचायतीची सर्वसाधारण सभा नुकतीच नगरपंचायतीच्या सभागृहात पार पडली. सभेत विविध विषयांवर चर्चा झाली. यामध्ये सर्वाधिक महत्त्वाची चर्चा करवाढीच्या प्रस्तावावर केंद्रित होती. लोकभावना व नागरिकांची मागणी लक्षात घेऊन नगरपंचायतीने करवाढ स्थगित केली.

सर्वसाधारण सभेत नगराध्यक्ष पराग मेहता, उपनगराध्यक्ष सुलतान बेणसेकर, मुख्याधिकारी माधुरी मडके, सर्व नगरसेवक व संबंधित अधिकारी उपस्थित होते. २०२५-२६ आर्थिक चालू वर्षाची करवाढीला स्थगिती देण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

या निर्णयामुळे पालीकरांना दिलासा मिळणार असून नगरपंचायतीने जनतेच्या हिताचा विचार करून पुढाकार घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. या निर्णयामुळे पाली शहरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

> **पालीकरांना मालमत्ता करवाढीपासून तूर्तास दिलासा मिळणार आहे. नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवकांनी मालमत्ता करवाढ करण्यास तूर्तास एक वर्ष स्थगिती दिली आहे. नागरिकांनी दिलेला पाठिंबा आणि केलेले आंदोलन यामुळेच हे शक्य झाले आहे. सर्वांचे आभार!**
>
> **-कपिल पाटील, नागरिक, पाली**

### करवाढ रद्दसाठी प्रयत्न

*या सभेत बोलताना नगराध्यक्ष पराग मेहता यांनी सांगितले की, यापूर्वी ३० डिसेंबर २०२४ रोजी तत्कालीन नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष आणि सर्व नगरसेवकांनी करवाढ रद्द करण्याचा ठराव घेतला होता, मात्र प्रशासनाने या ठरावावर अपील केल्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या समोर सुनावणी झाली आणि २५ मार्च २०२५ रोजी करवाढीसंदर्भात नगरपंचायतीने केलेला ठराव जिल्हा अधिकारी, अलिबाग यांनी रद्द केल्यामुळे नाईलाजाने नगरपंचायतला कारवाढ तशीच ठेवावी लागली होती. त्यानंतर आता नगरपंचायतीने पालीकरांच्या हितासाठी पुन्हा एकदा करवाढीला स्थगिती देण्याचा निर्णय घेतला. नगराध्यक्ष मेहता यांनी स्पष्टपणे सांगितले की, पाली नगरपंचायतीतील सर्व नगरसेवक हे जनतेच्या बाजूने ठामपणे उभे आहेत आणि त्यांच्या हिताचा विचार करूनच निर्णय घेत आहेत.*

# मच्छीमारांच्या समस्येवर अधिवेशनात लक्ष वेधणार -आमदार महेंद्र दळवी



**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवस-रेड्डी सागरी महामार्ग प्रकल्प अंतर्गत कुंडलिका समुद्र खाडीत साळाव-रेवदंडा नवीन पुलाचे बांधकाम करण्यात येत आहे. या पुलाच्या निर्मितीने स्थानिक मच्छीमार प्रकल्पबाधीत होत असून मच्छीमारांच्या न्याय हक्कांसाठी हिवाळी अधिवेधनात प्रश्न उपस्थित करणार असून शासनाच्या नियमाप्रमाणे आर्थिक नुकसानभरपाई मिळवून देण्याकामी निश्चित सहकार्य करेन, अशी ग्वाही आमदार महेंद्र दळवी यांनी दिली.

रेवदंडा मोठा कोळीवाडा येथील श्री खंडोबा मार्तंड मंदिरात प्रकल्पबाधीत मच्छीमारांची सभा आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी आमदार दळवी बोलत होते.

सभेस अशोक बिल्डकॉन कंपनीचे अधिकारी श्री. कानडे, दर्यातरण सागरी मच्छीमार सोसायटी चौल-रेवदंडाचे चेअरमन सुधाकर गुंडा, जिल्हा नियोजन समिती सदस्य संतोष निगडे, शिवसेनेचे ज्येष्ठ कार्यकर्ते व कोळी समाज बांधव नारायण मुंबईकर, संजय हवालदार, गणेश बाजी, महेश पाटील, सुरेश राऊळ, नारायण गोसावी यांच्यासह मोठ्या संख्येने रेवदंडा, चौल, आग्राव व साळाव परिसरातील मच्छीमार बांधवांची उपस्थिती होती.

या सभेत कोळी समाजाच्या वतीने कुंडलिका समुद्र खाडीत कोळशाची वाहतूक बार्जव्दारे होत असून या बार्ज जा-ये करताना कोळी बांधवांची जाळी तुटणे, सस तुटणे आदी नुकसानीस सामोरे जावे लागत असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. त्यावर आमदार महेंद्र दळवी यांनी होत असलेल्या अन्यायाविरोधात मच्छीमार बांधवांनी कायदेशीर आंदोलन छेडावे, या आंदोलनास सहकार्य व पाठिंबा राहील, असे म्हटले. त्याचप्रमाणे प्रकल्पबाधित सर्व मच्छीमारांना शासनाच्या नियमाप्रमाणे आर्थिक नुकसानभरपाई मिळण्यासाठी जे काही सहकार्य लागेल, ते देणार असून आगामी हिवाळी अधिवेशनात मच्छीमारांचा प्रश्न उपस्थित करून जास्तीत जास्त नुकसानभरपाई मिळवून देण्याची ग्वाही त्यांनी उपस्थित प्रकल्पबाधीत मच्छीमार बांधवांना दिली.

# कुडपण बुद्रुक रस्ता अन् थोरली नदी पुलाच्या दुरूस्तीची गरज


**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील सर्वात उंच असलेले ब्रिटीशकालीन थंड हवेचे ठिकाण कुडपण बुद्रुक येथे यंदा सुवर्णमहोत्सवी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन होणार असून यानिमित्त राज्यभरातून असंख्य वारकरी मंडळींची गर्दी उसळणार आहे. तत्पूर्वी कुडपण बुद्रुक रस्ता आणि थोरली नदीवरील पुलाच्या दुरूस्तीची गरज ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

ब्रिटीशांनी महाबळेश्वर हे हिल स्टेशन विकसित केले. त्याच काळात पोलादपूर तालुक्यातील कुडपण बुद्रुक गावाचीही हिल स्टेशन अशी नोंद ब्रिटीशदप्तरी तसेच नकाशामध्ये करून विकसित करण्याचा विचार केला होता. या गावाकडे जाण्यासाठी पक्का रस्ता नसल्याने माजी मंत्री स्व. प्रभाकर मोरे यांच्याप्रमाणेच माजी आमदार स्व.माणिकराव जगताप यांनी प्रयत्न केले. सद्यस्थितीत क्षेत्रपाळ या पायथ्याच्या गावापासून थेट कुडपण खुर्द शेलारांच्या कुडपणपर्यंत रस्ता करण्यात आला, मात्र आता या रस्त्याची दुरवस्था झाली आहे.

सध्या मंत्री आदिती तटकरे यांच्या आजी आणि मंत्री भरत गोगावले हे स्वत: श्री गणेशनाथ महाराज संस्थानचे अनुयायी आहेत. याच संस्थानातर्फे यंदा कुडपण बुद्रुक येथे सुवर्णमहोत्सवी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येणार असल्याने कुडपण ते क्षेत्रपाळ रस्ता दुरूस्त करण्यासोबतच थोरली नदीवरील साकव व बांध नव्याने बांधण्याची अथवा दुरूस्ती करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

कुडपण बुद्रुक येथे २९ डिसेंबर २०२५ ते १ जानेवारी २०२६ दरम्यान होणाऱ्या सुवर्णमहोत्सवी अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त येथे चार मोठे प्रशस्त मंडप उभारण्यात येणार असून वारकरी भाविकांसाठी तंबू उभारून राहण्याची सोयही करण्यात येणार आहे, मात्र कुडपण ते क्षेत्रपाल रस्त्याची अतिशय बिकट आणि धोकादायक अवस्था तसेच थोरली नदीवरील साकव व बांधाची जिर्णावस्था पाहता वारकऱ्यांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह कायम राहणार असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाचे स्थानिक प्रशासन, तहसीलदार तसेच रायगड जिल्ह्यातील दोन्ही मंत्रीमहोदयांनी तातडीने लक्ष घालून राज्यातून येणाऱ्या वारकऱ्यांची गैरसोय टाळण्याचे आवाहन ग्रामस्थांनी केले आहे.





# पाळीव प्राणी कत्तलप्रकरणी आरोपी गजाआड



बजरंग दलाकडून मुरूड पोलिसांचा सत्कार

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील विहूर येथील अझर जावेद वाळवटकर याने घराच्या मागील बाजूस पाळीव प्राण्यांची कत्तल केली असल्याची खबर लागताच मुरूड पोलीस ठाण्याचे निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली एक विशेष पथक तयार करण्यात आले. या पथकाने आरोपीला अटक केली आहे.

पोलिसांनी अझर वाळवटकर याच्या घराच्या मागील बाजूस तपासणी केली असता काही पाळीव प्राण्यांचे अवशेष दिसून आले. आरोपी वाळवटकर याला अटक करून मुरूड पोलीस ठाण्यात आणण्यात आले. त्याच्यावर भारतीय न्यायसंहिता २०२३चे कलम ३२५, प्राण्याचा छळ प्रतिबंधक १९६०चे कलम ११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी त्वरित दखल घेऊन आरोपीला अटक केल्याबद्दल बजरंग दलाकडून त्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी बजरंग दल संयोजक अक्षय महाडिक, सहसंयोजक ओमकार उमरोठकर, मानतेश जासूद, मंत्री महेश घाग, सहमंत्री प्रकाश शिंदे, कार्यकर्ता विश्वास म्हात्रे आदी उपस्थित होते.

# मुरूडमध्ये नगराध्यक्ष पदासाठी तिरंगी लढत

◆ २० प्रभागांमध्ये ५८ उमेदवार रिंगणात

**मुरूड : प्रतिनिधी**

येत्या २ डिसेंबर रोजी होणाऱ्या मुरूड नगर परिषद निवडणुकीसाठी नगराध्यक्षपद हे ओबीसी महिलेसाठी आरक्षित असून राष्ट्रवादी काँग्रेसच्या अनुराधा मंगेश दांडेकर, शिंदे शिवसेनेच्या कल्पना संदीप पाटील आणि शेकापतर्फे अंकिता मनिष माळी नगराध्यक्षपदाच्या शर्यतीत उतरल्या आहेत.

एकूण २० प्रभागांमध्ये सर्वच पक्षांनी उमेदवार दिले आहेत. १० प्रभागांसाठी चुरशीच्या निवडणुकीत एकूण ५८ उमेदवारांनी अर्ज कायम ठेवत राजकीय ताकद पणाला लावण्यासाठी सज्जता दाखवली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची आघाडी झाली असून त्यांनी संयुक्तपणे प्रचाराला प्रारंभ केला आहे. भारतीय जनता पक्षाचा उमेदवार नगराध्यक्षपदासाठी नसला तरी प्रभाग क्रमांक १ ब मधून जनार्दन सदाशिव कंधारे, २ अ मधून सुधीर भिकू पाटील, ब मधून सीमा जनार्दन कंधारे, प्रभाग क्रमांक ३ ब मधून उमेश भालचंद्र माळी आणि प्रभाग ४ ब मधून भाविका परेश किल्लेकर असे भाजपचे उमेदवार उभे ठाकले आहेत. येत्या दहा दिवसात जाहीर सभा, कॉर्नर सभा, समाज माध्यम, प्रचार फेऱ्या आदी माध्यमातून जोरदार प्रचार पहावयास मिळेल.

# रोह्यात कुणबी समाजातील गुणवंतांचा सन्मान




**रोहा : प्रतिनिधी**

कुणबी समाजाचे आधारस्तंभ मारूती खरीवले यांच्या वाढदिवसानिमित्ताने कार्याच्या गौरवार्थ मित्र परिवाराच्या वतीने नागरी सत्कार पारा सानप कुणबी भवन येथे करण्यात आला. या वेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणारे कुणबी समाजाचे माजी अध्यक्ष व समाजकार्य करणाऱ्या समाजातील ज्येष्ठ नेत्यांचा (७० वर्षांवरील) सन्मानित करण्यात करण्यात आले.

यामध्ये प्रामुख्याने मधुकर बामुगडे, यशवंत भोकटे, सुदाम रटाटे, राम करंजे, खेळू ढमाल, महादेव साळवी, तुकाराम बाईत यांना सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमास कुणबी समाज उपाध्यक्ष शंकर भगत, ओबीसी जनमोर्चा रायगड जिल्हा अध्यक्ष सुरेश मगर, माजी उपसभापती रामचंद्र सकपाळ, रामचंद्र चितळकर, प्रकाश थिटे, गजानन खांडेकर, हरिश्चंद्र मोरे, रमेश मोरे, रामा म्हात्रे, विठ्ठल मोरे, गुणाजी पोटफोडे, अनंत थिटे, विलास साळवी, दिनेश रटाटे, नामदेव म्हसकर, ज्ञानेश्वर साळुंके, परशुराम भगत, ज्ञानेश्वर दळवी, मुकेश भोकटे, महेश तुपकर, हेमंत मालुसरे, शशी कडू, नवनीत डोलकर, अरविंद मगर, अशोक तेंडुलकर, सुहास कारभारी आदी उपस्थित होते.

या वेळी सत्कारमूर्ती मारुती खरीवले, महादेव साळवी, खेळू ढमाल, तुकाराम बाईत, शंकर भगत, हरिश्चंद्र मोरे, सुरेश मगर, रामचंद्र सकपाळ आदींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने विविध समाजांचे नेते, कार्यकर्ते, समाज बांधव उपस्थित होते. सूत्रसंचालन रवी दिघे यांनी केले.

# मुरूड येथे शेअर मार्केट विषयावर मार्गदर्शन सत्र

**मुरूड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरूड येथे पुण्यातील धारा अकॅडमीच्या सहकार्याने ट्रेनिंग माइंड टू मास्टर द मार्केट या विषयावर विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात सर्व शाखांच्या अंतिम वर्षाच्या ६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

प्राचार्य डॉ. साजिद एफ. शेख यांच्या मार्गदर्शनाखाली करिअर कौन्सेलिंग कमिटी आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या नियोजनात झालेल्या या मार्गदर्शन सत्रासाठी प्रमुख वक्ते डॉ. देवेंद्र तरे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना शेअर मार्केटमधील मानसिक तयारी, ट्रेडिंग सायकोलॉजी आणि तणाव व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन केले. अस्थिर मार्केटमध्ये मनाची स्थिरता राखण्यासाठी काय उपयुक्त ठरते याबद्दल त्यांनी महत्त्वपूर्ण माहिती दिली. ट्रेडिंग क्षेत्रात मानसिक सक्षमतेचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी विद्यार्थ्यांना व्यावहारिक टिप्सदेखील दिल्या.

विद्यार्थ्यांना आर्थिक क्षेत्रातील संधी, आव्हाने आणि मानसिक तयारीचे महत्त्व समजावून देणारे हे सत्र अत्यंत उपयुक्त ठरेल, असे मत प्राचार्य डॉ. साजिद एफ. शेख यांनी व्यक्त केले.



# नागोठणे नाभिक समाज बांधवांची बैठक

## ◆ सेवानिवृत्त आरोग्यसेवक महेंद्र पवार यांचा सत्कार

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे शहर व विभाग नाभिक समाज बांधवांची विविध विषयांवर चर्चा विनिमय करण्यासाठी नागोठणे ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता मंदिर प्रांगणातील श्री संत ज्ञानेश्वर मंदिरात २२ नोव्हेंबर रोजी बैठक झाली. या बैठकीचे औचित्य साधून कोलाड प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्यसेवक नाभिक समाज बांधव महेंद्र पवार नुकतेच सेवानिवृत्त झाले, त्याबद्दल त्यांचा सत्कार करून उत्तम आरोग्य व निवृत्त काळासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.



या वेळी विभागीय अध्यक्ष बाळासाहेब टके, शैलेश रावकर, उदंड रावकर, शामकांत नेरपगार, महेंद्र माने, दिगंबर खराडे, रवींद्र टके, सुधाकर निंबाळकर, मिलिंद गुजर, जगदीश दिवेकर, महेंद्र पवार, संदीप जाधव, संदेश मोहिते, महेंद्र जाधव, गिरीधर दिवेकर, ओमकार जाधव, रवींद्र पवार, संतोष माने, रूपेश साळुंखे, स्वप्नील शिर्के, राकेश शिर्के आदी समाज बांधव उपस्थित होते. बैठकीच्या प्रारंभी रायगड जिल्ह्यातील निधन झालेल्या ज्ञात- अज्ञात समाज बांधवांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर समाजाचे खजिनदार मिलिंद गुजर यांनी समाजाच्या वार्षिक जमा खर्चाचा हिशोब दिला. २ जानेवारी रोजी हुतात्मा वीरभाई कोतवाल यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना मानवंदना देण्यासाठी ठाणे जिल्ह्याच्या मुरबाड तालुक्यातील सिद्धगड येथे जाण्यासाठी नियोजन करण्यात आले.

# निकम स्कूलमध्ये कला तरंग प्रदर्शन उत्साहात

**माणगाव : बातमीदार**

एस.एस. निकम इंग्लिश स्कूल, लोणेरे येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही कला तरंग प्रदर्शन २०२५ हा उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव देणारा आणि विविध कलाप्रकारांचा संगम घडवणारा हा उपक्रम सर्वच स्तरातून दाद मिळवणारा ठरला.

कार्यक्रमाचे उद्घाटन सुप्रसिद्ध कला शिक्षक आदेश सुतार यांच्या हस्ते झाले. उद्घाटनानंतर विद्यार्थ्यांनी मांडलेल्या कलाकृती, प्रोजेक्ट्स आणि सांस्कृतिक प्रयोग पाहून त्यांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे कौतुक केले. शाळेने प्रदर्शनीसाठी अवलंबलेली नाविन्यपूर्ण पद्धत, विषयांची मांडणी आणि प्रत्येक कलेमागील विचार पाहून सुतार यांनी शाळेच्या व्यवस्थापनाची व शिक्षकांची प्रशंसनीय भूमिका अधोरेखित केली.

या कार्यक्रमाला शाळेचे चेअरमन ॲड. प्रकाश ओक, ॲड. राहुल ओक व राखी ओक यांनी उपस्थिती दर्शवली. विद्यार्थ्यांनी निवडलेल्या विषयांचे आधुनिक सादरीकरण, कला व तंत्रज्ञानाचा संगम तसेच प्रकल्पांचे उत्कृष्ट नियोजन पाहून त्यांनी विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे अभिनंदन केले.

शाळेच्या प्राचार्य दर्शना सुधाकर चावरेकर व मुख्याध्यापक ज्ञानेश्वर खाडे यांच्या दूरदृष्टीमुळे या उपक्रमाला योग्य दिशा मिळाली. त्यांचे मार्गदर्शन, नियोजन आणि प्रोत्साहन आणि विद्यार्थ्यांचे कसब, शिक्षकांचे सहकार्य यामुळेच कला तरंग २०२५ प्रदर्शनी यशस्वीरीत्या साकार झाल्याचे व्यवस्थापनाने सांगितले.

# पहिल्या डावात आफ्रिकेच्या ४८९ धावा

## भारताविरुद्धच्या कसोटीत मुथुस्वामीचे शानदार शतक

**गुवाहाटी : वृत्तसंस्था**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दुसऱ्या कसोटी सामन्याचा दुसरा दिवस संपला असून दक्षिण आफ्रिकेच्या मधल्या फळीने भारतीय गोलंदाजांची सत्त्वपरीक्षा पाहिली. पाहुण्यांनी पहिल्या डावात ४८९ धावा केल्या आहेत. त्यानंतर दिवसअखेर भारताने पहिल्या डावात नऊ धावा केल्या.



द. आफ्रिकेच्या सेनुरन मुथुसामी याने सातव्या क्रमांकावर फलंदाजीला येत शानदार शतक झळकावले. त्याने भारतीय गोलंदाजांच्या नाकीनऊ आणले आणि द. आफ्रिकेचा डाव मोठ्या धावसंख्येपर्यंत नेण्यात सिंहाचा वाटा उचलला. दुसऱ्या दिवसाची सुरुवात झाली ती मुथुसामी आणि काइल वेरेने यांच्या भागीदारीने. या जोडीने आफ्रिकेचा डाव पुढे नेला. दोघांनी सातव्या विकेटसाठी तब्बल ८८ धावांची भागीदारी रचली.

सकाळच्या पहिल्या सत्रात भारतीय गोलंदाजांना एकही विकेट घेता आली नाही, ज्यामुळे हे सत्र पूर्णपणे पाहुण्या संघाच्या नावावर राहिले. मुथुसामी आणि वेरेने यांनी संयमी आणि आक्रमकतेचा समतोल साधत भारतीय गोलंदाजांना अक्षरशः विकेटसाठी हतबल केले. दुसऱ्या सत्रात रवींद्र जडेजाने वेरेनेला बाद करत भारताला दिवसाचे पहिले यश मिळवून दिले, मात्र वेरेने बाद झाल्यानंतरही मुथुसामीचे मनोधैर्य खचले नाही. त्याने मार्को यानसेन याच्या साथीने आणखी एक महत्वपूर्ण भागीदारी केली आणि संघाचा स्कोर ४०० धावांच्या पलिकडे नेला. याचदरम्यान मुथुसामीने आपले पहिले आंतरराष्ट्रीय कसोटी शतकाचा टप्पा पार केला. वेरेने याने ४५ धावांचे योगदान दिले.

कुलदीप यादवने जॅन्सनला बाद करून दक्षिण आफ्रिकेचा डाव संपवला. भारताकडून कुलदीपने चार, तर बुमराह, सिराज आणि जडेजा यांनी प्रत्येकी दोन विकेट घेतल्या. सध्या दक्षिण आफ्रिकेपेक्षा ४८० धावांनी पिछाडीवर आहे. खेळ संपला तेव्हा, यशस्वी जयस्वाल ७ धावा आणि केएल राहुल २ धावा करून क्रिजवर होते. पहिल्या डावात दक्षिण आफ्रिकेला बाद केल्यानंतर यशस्वी आणि राहुल यांनी सावध फलंदाजी केली.

# राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी रोह्यातील आर्यन कमानेची निवड

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील तळाघर येथील अष्टपैलू खेळाडू आर्यन विनोद कमाने याने आपली चमकदार कामगिरी सिद्ध करत पुणे येथे होणाऱ्या ५२व्या कुमार गट रायगड जिल्हा कबड्डी संघात स्थान मिळविले आहे. ही स्पर्धा २५ ते २९ नोव्हेंबरदरम्यान पुण्याच्या बोपखेल येथे रंगणार आहे.

आर्यनने शालेय जीवनातच क्रीडा क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली. विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होऊन त्याने यश संपादन केले आहे. नियमित पहाटे उठून रनिंग, व्यायाम, शिस्तबद्ध दिनचर्या आणि खेळाप्रती असलेली निष्ठा यातून त्याचे व्यक्तिमत्त्व घडत गेले. सातत्यपूर्ण मेहनतीच्या बळावर आज तो रायगड जिल्हा कबड्डी संघाच्या निवडीस मानकरी ठरला आहे.



रोहा तालुका भाजप अध्यक्ष अमित घाग यांच्यासह विविध राजकीय पक्षातील नेते, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, शिक्षकवर्ग, क्रीडाप्रेमी आणि ग्रामस्थ यांनी आर्यन कमानेचे अभिनंदन करून भावी कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या.

# घन:श्याम मशिलकर यांना ॲथलेटिक्समध्ये तीन सुवर्णपदके

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

संयुक्त भारत खेल फाउंडेशनची बारावी आंतरराष्ट्रीय ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२५ भूतानची राजधानी थिंपू येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील रसायनी येथील घन:श्याम श्रीकृष्ण मशिलकर यांनी तीन सुवर्णपदके पटकाविली.




स्पर्धेत विविध देशांतील सुमारे ८०० खेळाडूंचा सहभाग होता. रिलायन्स इंडस्ट्रीज पाताळगंगाकडून खेळताना घनःश्याम मशिलकर यांनी ५५ वर्षावरील गटात भारतीय संघाचे प्रतिनिधित्व केले. त्यांनी शंभर मीटर धावणे, लांब उडी आणि तिहेरी उडी या खेळांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करून सुवर्णपदके जिंकली. याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

# पुण्यातील बोपखेल येथे उद्यापासून कुमार गट राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने, पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या यजमानपदाखाली पिंपरी चिंचवडच्या बोपखेल येथील श्रीरंग धोदाडे क्रीडानगरीत राकेशभाऊ घुले कबड्डी संघ व युवा प्रतिष्ठान तसेच महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या विद्यमाने कुमार कुमारी गट राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा २५ ते २९ नोव्हेंबर या कालावधीत खेळली जाणार आहे.



या स्पर्धेत २५ संलग्न जिल्ह्यांचे ३१ कुमार व ३१ कुमारी गटाचे संघ सहभागी होणार आहेत. या स्पर्धेतून महाराष्ट्राचे दोन्ही गटाचे संघ निवडण्यात येतील. डिसेंबर २०२५च्या शेवटच्या आठवड्यात पश्चिम बंगाल राज्यात होणाऱ्या राष्ट्रीय कुमारी गट स्पर्धेत महाराष्ट्राचा हा संघ प्रतिनिधीत्व करेल, तर आंध्र प्रदेश येथे जानेवारी २०२६च्या मध्यावर होणाऱ्या राष्ट्रीय कुमार गट स्पर्धेत महाराष्ट्राचा हा संघ सहभागी होईल.

गतवर्षी सांगली येथे झालेल्या राज्य स्पर्धेतील कुमार गटात ठाणे शहर संघ विजेता, तर पुणे ग्रामीण संघ उपविजेता ठरला होता. कुमारी गटात मात्र पुणे ग्रामीणने जेतेपद पटकाविले होते, तर पिंपरी चिंचवड संघ उपविजेता ठरला होता. आता तर पुण्यातच स्पर्धा होत आहे. त्याचा फायदा पुण्याच्या तीन संघापैकी कोण उठवतो हे पहाणे औत्सुक्याचे ठरेल.


स्पर्धेकरिता मॅटची सहा क्रीडांगणे तयार करण्यात येणार आहेत. सामने शक्यतो सायंकाळच्या सत्रात प्रखर विद्युतझोतात खेळविण्यात येतील, पण हिवाळा असल्याने दव पडण्याची शक्यता लक्षात घेऊन सामने सकाळच्या सत्रातदेखील खेळविले जातील. स्पर्धेची तयारी उत्साही वातावरणात सुरू आहे. लवकरच स्पर्धेची गटवारी जाहीर करण्यात येईल, अशी माहिती राज्य संघटनेचे सचिव बाबुराव चांदेरे यांनी दिली.

# बोरीवलीत रंगणार ‘खासदार श्री’चा थरार; विजेत्यांवर होणार पारितोषिकांचा वर्षाव

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील युवा क्रीडापटूंना योग्य व्यासपीठ मिळावे, त्यांना आपले क्रीडा कौशल्य सादर करता यावे म्हणून सदैव तत्पर असणारे क्रीडाप्रेमी खासदार तथा केंद्रीय वाणीज्य आणि व्यापार मंत्री पीयुष गोयल यांनी येत्या ३० नोव्हेंबरला खासदार श्री शरीरसौष्ठव स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेत मुंबईतील शरीरसौष्ठवाचे पीळदार ग्लॅमर अवतरणार असल्यामुळे विजेत्यांवर पाच लाखांच्या बक्षीसांचा वर्षाव केला जाणार आहे. स्पर्धा एकंदर १० गटांत खेळविली जाणार आहे.

उत्तर मुंबईचे खासदार पीयुष गोयल यांच्या संकल्पनेतून गेला महिनाभर सुरू असलेल्या खासदार क्रीडा महोत्सवातील सर्वात आकर्षक आणि क्रीडाप्रेमींचा आवडता खेळ असलेल्या शरीरसौष्ठवाची भव्य स्पर्धा बोरीवली पश्चिमेला महावीर नगरातील वसंत कॉम्प्लेक्सजवळील प्रमोद महाजन क्रीडा संकुलात आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने मुंबईतीलतील एकापेक्षा एक अशा १५०पेक्षा अधिक खेळाडूंच्या पोझयुद्धाचा अनोखा खेळ मुंबईकरांना पहायला मिळणार असल्याची माहिती खासदार स्पर्धेचे संयोजक आणि निमंत्रक कुणाल केरकर यांनी दिली.



केवळ मुंबई आणि आसपासच्या उपनगरातील खेळाडूंसाठी आयोजित या स्पर्धेत सहभागी खेळाडूंच्या मेहनतीला प्रोत्साहन मिळावे आणि मोठ्या संख्येने शरीरसौष्ठवाचे ग्लॅमर महाजन क्रीडा संकुलात अवतरावे म्हणून प्रत्येक गटातील पहिल्या पाच क्रमांकाच्या विजेत्यांना १०, ८, ६, ५ आणि ४ हजार असे रोख पुरस्कार दिले जाणार आहेत. ही स्पर्धा ५५, ६०, ६५, ७०, ७५, ८० आणि ८० किलोवरील अशा एकंदर सात गटात खेळली जाईल. तसेच खासदार श्रीच्या चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्सच्या विजेत्याला एक लाखाचे इनाम आणि खासदार श्री किताब देऊन खासदार पीयुष गोयल गौरविणार असल्याचेही आयोजक कुणाल केरकर यांनी सांगितले. एवढेच नव्हे तर स्पर्धेच्या उपविजेत्यालाही ५० हजार आणि तिसऱ्या क्रमांकाच्या विजेत्याला २५ हजार रुपयांचा पुरस्कार दिला जाणार आहे. शरीरसौष्ठवाच्या हंगामातील ही पहिलीच लाखमोलाची ग्लॅमर असलेली स्पर्धा होतेय, ज्यात मुंबई शरीरसौष्ठवाची खरी पीळदार श्रीमंती पहायला मिळेल.

### महिला, मेन्स फिजीकचीही स्पर्धा

*मुंबईतील शरीरसौष्ठवपटूंच्या थराराबरोबर महिलांच्या शरीरसौष्ठव स्पर्धेचाही एक गट या स्पर्धेत खेळविला जाणार आहे. यात अव्वल दहा महिला शरीरसौष्ठवांचा सहभाग निश्चित असल्याची माहिती मुंबई शरीरसौष्ठव संघटनेचे सरचिटणीस राजेश सावंत यांनी दिली. मेन्स फिजीकचीही स्पर्धा दोन गटात खेळविली जाईल.*

# जेएसडब्ल्यू कंपनीद्वारे प्रशिक्षित कराटेपटूंचे सुयश

## नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये पदकांची लयलूट




**रेवदंडा : प्रतिनिधी**

कल्याण येथे झालेल्या ईगल आय नॅशनल कराटे चॅम्पियनशिप २०२५मध्ये साळाव जेएसब्ल्यू प्रशिक्षित कराटेपटूंनी सुयश प्राप्त केले. या स्पर्धेत देशातील विविध राज्ये व जिल्ह्यातील ४७ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

रायगड जिल्ह्यात जेएसडब्लू फाउंडेशनच्या वतीने साळाव सीएसआरच्या अंतर्गत विद्यार्थिनींना कराटेचे मोफत प्रशिक्षण देण्यात येते. ईगल आय नॅशनल कराटे चॅम्पियनएिपमध्ये जेएसब्ल्यू प्रशिक्षित २५ कराटेपटू विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता. त्यांनी कातामध्ये नऊ सुवर्ण, सहा रौप्य व आठ कांस्य, तर कुमिते प्रकारात सहा सुवर्ण, आठ रौप्य व नऊ कांस्य अशी एकूण ४६ पदके जिंकली. त्याचप्रमाणे ग्रॅट चॅम्पियनशीपमध्ये काता प्रकारात पाच कांस्य, कुमितेमध्ये एक कांस्य आणि एक बेस्ट फायटर पदक पटकाविले.

यशस्वी विद्यार्थिनींचे जेएसडब्ल्यू ग्रीन प्लॅंट हेड पंकज मलिक, रिझनल सीएसआर हेड सुधीर तेलंग, इन्चार्ज गणेश घोडके यांनी अभिनंदन केले.

# चौकमध्ये वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात

**चौक, खोपोली : प्रतिनिधी**

विद्या प्रसारिणी सभा चौक संचलित प्राथमिक विद्यामंदिर व शिशुमंदिर यांचा वार्षिक क्रीडा महोत्सव रंगला. याचा शुभारंभ राष्ट्रीय कुस्तीपटू क्षितिजा जगदीश मरागजे हिच्या हस्ते झेंडावंदन करून करण्यात आला.

उद्घाटन समारंभास अध्यक्ष म्हणून संस्थेच्या कार्याध्यक्ष शोभा देशमुख उपस्थित होत्या. कार्यक्रमाला संस्थेचे पदाधिकारी, सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिरचे मुख्याध्यापक गायकवाड, संस्थेचे पर्यवेक्षक व प्राथमिक व शिशुमंदिरचे समन्वयक देवानंद कांबळे, हेल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गुरुनाथ साठेलकर, मंगेश सावंत, पूजा मरागजे, प्राथमिक विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका व संचालिका सुलभा गायकवाड आदी उपस्थित होते.

प्रमुख पाहुणी राष्ट्रीय कुस्तीपटू क्षितिजा मरागजे याने शालेय पातळीपासून राष्ट्रीय स्तरापर्यंतच्या प्रवासातील अनुभव सांगत



विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश दिला, तर अध्यक्षीय भाषणात शोभा देशमुख यांनी विद्यार्थीवर्गाला प्रोत्साहन देत क्रीडा महोत्सवासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

हेल्प फाउंडेशनचे अध्यक्ष गुरुनाथ साठेलकर यांनी विद्यार्थ्यांना संतुलित आहार, मोबाईलचा मर्यादित वापर आणि क्रीडेमुळे होणारे सर्वांगीण लाभ या विषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय समन्वयक देवानंद कांबळे यांनी करून दिला. सूत्रसंचालन माधवी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार अश्विनी वडवले यांनी मानले.

# ठाण्यात विभागीय खो-खो स्पर्धा

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने आणि धी. युनायटेड स्पोर्ट्स क्लब, ठाणे यांच्या आयोजनाखाली श्री दत्त जयंती उत्सवानिमित्त कै. जे.पी. कोळी यांच्या स्मरणार्थ निमंत्रित विभागीय पुरुष व महिला खो-खो स्पर्धेचे आयोजन २ ते ४ डिसेंबरदरम्यान ठाण्यात करण्यात आले आहे.



या स्पर्धेसाठी पुरुष व महिलांच्या प्रत्येकी १६ प्रतिष्ठित संघांना सहभागाची परवानगी तसेच शुभेच्छा महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस डॉ. चंद्रजित जाधव यांनी दिल्या आहेत, तर राज्य खो-खो असोसिएशनतर्फे बाळासाहेब (बाळ) तोरसकर स्पर्धेचे निरीक्षण करणार आहेत, अशी माहिती संस्थेचे विश्वस्त अध्यक्ष दत्तात्रय ठाणेकर आणि विश्वस्त आयोजक हेमंत कोळी यांनी दिली.

स्पर्धेत ठाणे, मुंबई व मुंबई उपनगरातील दमदार आणि परंपरागत ताकदवान संघांची रंगतदार लढत होणार आहे. ठाण्यातील खो-खोप्रेमींसाठी ही तीन दिवसीय स्पर्धा एक पर्वणी ठरणार असून कौशल्य, वेग, चातुर्य आणि संघभावनेच्या दुर्मिळ मेळ्याचे दिमाखदार दर्शन घडवणार आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com